

आशा पाटील
नशीब
ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

# नशीब

आशा पाटील

ई साहित्य प्रतिष्ठान

# नशीब

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

नशीब  (कथासंग्रह)

पत्ता- सौ.आशा अरूण पाटील

साईराम न्यू सी ४२३/ ४२४ सिंधू विहार

विजापूर रोड जुळे सोलापूर सोलापूर

४१३००८

संपर्क क्रमांक ९४२२४३३६८६

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com


esahity@gmail.com

प्रकाशन : २५ एप्रिल २०१८

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

सौ आशा पाटील यांनी लिहीलेला व ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े प्रकाशित झालेला कथासंग्रह “एकटी” वाचण्यासाठी ही लिंक वापरा

- एकटी : कथासंग्रह: आशा पाटील
  - http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ekatee_asha_patil.pdf



# जीवनाचे वास्तव दाखविणाऱ्या कथा

नाविन्याचा, विशेषत: तंत्रज्ञानाचा आविष्कार नवी पिढी सहजतेने करते आहे. ई तंत्रज्ञानाने पुस्तकांच्या विश्वात क्रांतीच केली आहे. या पार्श्वभूमीवर आशाताईंनी ई पुस्तकांकडे आपला मोर्चा वळविणे स्वाभाविकच आहे. 'नशीब' हा त्यांचा द्वितीय ई-बुक कथासंग्रह.

या कथासंग्रहात एकूण सात कथा आहेत. त्यांच्या कथा वरवर कौटुंबिक वाटल्या तरी त्यांना सभोवतालच्या बदलत्या जगाची गडद पार्श्वभूमी असते. 'सल' कथेत शेवंताबाईंना छळणाऱ्या जावयाची कथा उलगडताना त्या एका विधवा पण कर्तबगार, धैर्यवान, प्रौढेची व्यक्तिरेखा साकारतात. मुलीच्या लग्नातच अंगठीसाठी हटून बसणारा जावई, सासूच्या बागाईत जमिनीवर डोळा ठेवून बायकोचा छळ करतो. त्याचे पर्यावसन बायकोच्या व मुलीच्या आत्माघातात होते. बायकोच्या माहेरच्या मिळकतीवर अधिकार गाजवू पाहणाऱ्या पुरुषसत्ताक मानसिकतेमुळे त्याची शोकांतिका होते. पुढे ती त्याला आयुष्यभर सलत राहते; पण धैर्यवान शेवंताबाई वाचकांच्या मनात रेंगाळत राहते. कथेच्या निवेदनाच्या ओघात आशाताई 'गरिबाच्या घरात सौंदर्य देवाने भरभरून दिलेलं असतं' अशी सुभाषितवजा चमकदार वाक्ये लिहून जातात.

'निर्धार' या कथेत पित्याने सीमेवर मुलगा शहीद झाला, हे बायको, सून, नातवांपासून लपवलेले रहस्य जेव्हा त्यांच्या मृत्यूनंतर अचानक समोर येते. तेव्हा सौभाग्यवती राहून परिस्थितीला धीराने तोंड देणाऱ्या शहीद पत्नीचा ठाम निर्धार वंदनीय व प्रेरणादायी वाटतो. अपघाताने मातृत्वाला मुकलेली रिमा अनाथाश्रमातून वंशाचा दिवा आणते तेव्हा प्रथम तिच्या मनात त्याच्या अनुवंशिक

गुणांविषयी  काहूर उठते. समाज भयाने ती गाव सोडते पण त्याच पोराच्या अस्तित्वाने कुटुंबाची भरभराट होते.

'नशीब' ही या पुस्तकातील शीर्षककथा. नवऱ्याच्या असाध्य आजारपणात दोन मुलं, वृद्ध सासूसह नौकरी करत, ती संसार रेटत जीवनाच्या रंगमंचावरची खेळणं न होता बेरंग झालेल्या संसारात मुलांसाठी नवे रंग भरण्यासाठी मन मारून सज्ज झालेल्या संपदांची ही चटका लावणारी पण जगण्याची जिद्द देणारी आशावादी विचारांची कथा आहे. लेखिकेने कथा विषय निवडताना सतत बदलत्या काळाची दखल घेतली आहे. महिला राखीव जागांमुळे गावची पहिली सरपंच झालेली रमा नवऱ्याच्या प्रतिष्ठेने या पदावर बसली आहे. मालकाची बायको म्हणून ती मालकीन. पदवीधर असूनही ग्रामपंचायतीच्या मिटिंगमध्ये बोलायची तिला बंदी; पण नवऱ्याला अपघाताने आलेल्या अपंगत्वामुळे ग्रामपंचायतीच्या कामात लक्ष घालून गावाचा विकास करत, ती आदर्श सरपंच ठरते. गावाची खरी मालकीण होते. हा प्रवास लेखिकेने रंगवताना ग्रामीण भागाची वास्तव बाजू समोर आणली आहे.

'वाट' या कथेत ग्रामीण भागातल्या महाविद्यालयीन तरुणाला आता कष्टाची लाज वाटू लागली आहे. वडिलांनी रात्री रानात दारं धरायला सांगितलेला राग मनात ठेवून तो घर सोडून जातो. कमवून घरी परत येण्याची जिद्द करतो. आई बाप मात्र चुकलेलं लेकरू परत येईल. म्हणून वाट पाहात राहतात.

'उद्ध्वस्त' या कथेत योगा शिकवणारी, पर्यावरणाची अभ्यासक अशा रसिक वृत्तीच्या रसिकाला अचानक ब्रेन ट्यूमर होतो. वृद्धाश्रम काढण्याचं तिचं

स्वप्न; पण त्या एव्हर ग्रीन, ब्लॅक ब्युटीची आजाराने दुर्दशा होते. तिच्या जाण्याने घरातील अबोली अबोल होते.

सौ. आशा पाटील यांची ओळख आता कथालेखिका म्हणून वाचकांना झाली आहे. त्यांच्या कथेतील व्यक्तिचित्रे वाचकांना सभोवतालच्या जगात सहज सापडतात व विशेषत: स्त्रीव्यक्तिरेखा कणखर परिस्थितीला धैर्याने सामोरे जातात. सामान्य स्थितीतील जिद्द आणि सहनशीलता त्या कथेतून अधोरेखित करतात. त्यांची भाषा शैली चित्रमय आणि ओघवती आहे. वाचकांना बरोबर नेणारी आहे. तिला ग्रामीण नागरीपणाचा बाज आहे. ग्रामीण जीवनाचे झपाट्याने होणाऱ्या नागरीकरणाचे परिणाम कथेतून स्पष्ट दिसतात. बहुतेक कथेत ‘स्त्री’ पात्रे मध्यवर्ती आहेत, सर्वसामान्य कुटुंबातील आहेत; पण नशिबाने त्यांच्या आयुष्याची वाट लावली असली तरी उद्ध्वस्त होवूनही ती सल विसरून निर्धाराने प्रेरक भविष्याची मालकीन झालेली दिसते. अशात ग्रामीण अर्धनागरी वातावरणातील स्त्री व्यक्तिरेखा केवळ जिवंत केल्या नाहीत तर त्या प्रेरकही आहेत. रंजक कथांतून प्रेरित करणाऱ्या या कथांचे स्वागतच केले पाहिजे. वाचक ते नक्कीच करतील.


प्रकाश जडे

अध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद

दामाजीनगर

मंगळवेढा

अर्पणपत्रिका –

मित्र बनून जीवनात क्षणोक्षणी पाठराखण करून

प्रोत्साहन देणाऱ्या

प्रिय पती ‘गोल्डीस’

वाढदिवसाची भेट

- प्रकाशन तारीख- २५ एप्रिल २०१८

---आशा पाटील

# कथानुक्रम

प्रेरक

निर्धार

वाट

नशीब

उद्ध्वस्त

मालकीण

सल

# प्रेरक

साहिल पळतच येऊन तिला हाका मारू लागला; पण ती कसल्या तरी विचारात गुंतली होती.

आज तिला शेजारणीने बोललेले शब्द जिव्हारी लागली होते, मनाला बोचले होते. तिला खूप वाईट वाटलं.

सीमा एकटीच बसली होती. घरात लाईट लावायच्याही तिच्या डोक्यात आलं नव्हतं. साहिल तिला ममा, ममा म्हणून हाका मारू लागल्यावरच ती भानावर आली.

'काय रे बेटा' हे तिचे वाक्य पूर्ण होण्याअगोदर साहिल तिला बिलगला. तिची ममता दाटून आली, तिने साहिलच्या तोंडावरून मायेने हात फिरवला. अन् त्याची गोड पापी घेतली.

काय झाले म्हणून विचारले असता, 'भूक लागली काही तरी देना' या वाक्यावर तिन्ही पटकन स्वतःचा मूड बदलला अन् त्याला त्याच्या आवडीचा गरम शिरा करून दिला. साहिलची तब्बेत चांगली होती. त्यामुळे त्याला सर्वजण गोलू म्हणत. गोलू दिसायला एकदम गोंडस कापसासारखा पांढरा. वर्ण गोरा, टपोरे डोळे, रेखीव भुवया अन् कुरळे केस. वयाच्या मानाने उंचीही भरपूर. सीमा अन् सुरेशमधले कोणतेच गुण त्याच्यात दिसत नव्हते. सुरेश काळा सावळा, साधारण उंचीचा, तर सीमाचा गहूवर्ण, केसही सरळ.

साहिल अगदी पंधरा दिवसांचा असतानाच सीमा अन् सुरेशने त्याला मातृत्व या संस्थेतून दत्तक घेतलं होतं. कारण सीमा स्वतः आई होणारच होती तेव्हा काळाने तिच्या गर्भात असताना बाळावर एका अपघाताच्या रुपाने झडप घातली. एवढेच नव्हे, तर सीमा या अपघातानंतर पुन्हा आई होऊ शकणार नाही. या

गोष्टीचा सीमाला खूपच त्रास होऊ लागला. तिला आता जीवनात रस वाटेना. एरवी दररोज नीटनेटकी राहणारी सीमा, दोन दिवस गेले तरी केस आवरेना. कोणत्याच गोष्टींचं भान तिला राहिलं नाही. एखाद्या फुलाचा सुगंध अचानक गायब व्हावा तसाच काहीसा प्रकार सीमाच्या बाबतीत झाला तिला आता कोणतीच गोष्ट आवडेना, रुचेना, पटेना.

शेजारी पाजारी एखाद्याच्या घरी गेलं आणि बोलण्या बोलण्यातून एखादा शब्द तिच्याविषयी नसला तरी तिला तो जिव्हारी लागे. एखाद्या शस्त्राने जसा व्यक्ती जखमी होतो, त्याप्रमाणे ती शब्दांनी घायाळ होई. आपल्या जीवनाचे ध्येय काय ? हा प्रश्न पुन्हा पुन्हा स्वतःच्या मनाला विचारत असे.

सुरेश मात्र नेहमी तिला खूप समजून सांगे “फक्त मूल होणं. ही एकच गोष्ट आपल्यासाठी खूप महत्त्वाची आहे असे आपण मानत नाही”. हे तिला समजून सांगे. सीमाने तर सुरेशपुढे दुसरे लग्न करण्याचा प्रस्ताव मांडला होता. सुरेशचं सीमांवर जीवापाड प्रेम होतं. त्याला सीमा शिवाय त्याच्या जीवनात कोणती स्त्री येणं मान्य नव्हतं. सुरेशच्या जीवनात दोन स्त्रिया खूप महत्त्वाच्या होत्या. पहिली म्हणजे त्याची आई अन् दुसरी त्याची सहचारिणी सीमा. त्याला त्याच्या घराण्याची वंश परंपरा, वंशवेल अशा गोष्टीत जास्त स्वारस्य नव्हते.

मात्र आई आणि सीमा या दोघींच्या हट्टापुढे मात्र त्याने हात टेकले बघता बघता सुरेश साठी म्हणून सीमा आणि आईने मुली पाहायला सुरुवात केली. सुरेशला मात्र हे कोणत्याही परिस्थितीत मान्य नसल्याने त्याने वेगळा काही मार्ग निघतो का? ते पाहायला सुरुवात केली. विचाराअंती त्याला मूल दत्तक घेण्याचा सन्मार्ग दिसला. सीमावर त्याचे जीवापाड प्रेम होते आणि मूल होत नाही म्हणून दुसरं लग्न हे त्याला मान्य नव्हतं. सीमाला हा विचार पटायला दहा -पंधरा दिवस गेले. त्यानंतर हळूहळू घरातील सदस्यांना पटवून सांगण्याची जबाबदारी सुरेशने घेतली. बघता बघता घरामध्ये सुरेशचे बाबा, भाऊ, बहिणी, वहिणी सर्व तयार

झाले; पण आई काही तयार होईना. तुम्ही कोणाचे मूल आणणार, ते कोणाच्या पोटचे असणार, त्यामध्ये अनुवंशिक गुण कसले असणार. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो वंशाचा दिवा, अनाथाश्रमातून आणायचा. त्याला अनाथ करणारे आई बाबा कसे असतील. का त्यांनी त्याला अनाथ आश्रमात सोडले असेल. कधी काळी पुन्हा ते आमचं बाळ म्हणून आपल्या दाराशी येतील का ?

आईला समजून सांगता सांगता सुरेशला सुरेशला नाकी नऊ आले. सुरेश सीमाच्या मते फूल कोणत्या वेलीवर किंवा कोणत्या जमिनीत उगवणार हे त्याच्या हातात नसतं. ती गोष्ट त्याच्या हातात नाही. पण कोवळया जीवाला आपलंसं करून आपल्या वंशाचं नाव आपण दिलं तर त्याच्या जीवनाचा उद्धार तर होईलच; पण आपल्याही जीवनाचा उद्धार होईल. कोवळया मनावर केलेले संस्कार खोलवर रुजतात आणि हेच संस्कार जीवनाच्या वाटेवर घट्ट मूळ रोवून ताठ उभे राहतात. आईने सुरेशच्या हट्टापुढे हात टेकले.

शेवटी एके दिवशी सर्व सोपस्कार पूर्ण करून तो कोवळा जीव घरात आणला. त्याचे नामकरण करण्यात आले. त्याच्या बाल लीला आणि मोहक दिसण्याने, अवघ्या काही दिवसांत तो घरात सर्वांचा जीव की प्राण झाला. त्याला काय हवं काय नको हे बघण्यात, त्याचे संगोपन करण्यात सीमा सुरेश काय; पण पूर्ण परिवाराचा वेळ कसा भुर्रकन उडून जाई ते कळतच नव्हते. सुरेशच्या आईच्या मनातला किंतुही हळूहळू निघून गेला.

साहिल चंद्राच्या कलेप्रमाणे मोठा होऊ लागला त्याचे रूप अन् गुणही वाढू लागले. संस्कार करण्यात घरात कोणीच कमी पडत नव्हते; पण हळूहळू साहिल जसा मोठा होऊ लागला तसे त्याचे विश्व मोठे होऊ लागले. घरातून बाहेर मित्रांबरोबर खेळायला जायला त्याला आवडू लागले. तो शेजारच्या बाल दोस्तांमध्ये चांगलाच रमू लागला. शेजारच्या काकूंनी एके दिवशी त्याला खेळत

असताना तू कोणाचा? असा प्रश्न विचारल्यावर, तो तीन साडेतीन वर्षांचा कोवळा जीव आनंदाने पटकन म्हणाला. आईचा, बाबांचा, मम्मीचा, पप्पांचा, काकाचा, काकूचा, अत्याचा अन् तुमचाही. या वाक्यासरशी काकू त्याला लगेच म्हणाल्या, तू या कोणाचाच नाही. तुला विकत आणलंय. तू कोणाचा नाही, तुझं कोणी नाही या वाक्यासरशी तो बावरला, रडू लागला. आपल्याला कोणीच नाही. ही भावना त्याला अनावर झाली, अन् तो मोठ्याने रडू लागला.

त्या आवाजा सरशी सीमा पळतच बाहेर आली, अन् आपल्या कोकराला तिने अलगद उचलून कडेवर घेतले. साहिलने त्याचे रडणे थांबल्यावर, शेजारच्या काकू काय म्हणाल्या ते सांगितले. तोपर्यंत काकू निघून गेल्या होत्या.

सीमाला एकीकडे रागाने संताप अनावर झाला. तर दुसरीकडे रडूही कोसळले. साहिल पुढे मात्र ती शांत राहिली. घरात नेऊन त्याला नाना युक्त्या करून शांत करत तिने त्याला गप्प केले, अन् सर्वच बाळं दवाखान्यातून विकत आणतात. त्या प्रमाणे तुलाही आणलं. काही का होईना सांगून मन शांत केलं.

काही वेळातच तो झाला प्रकार विसरून गेला. रात्री जेवण करून साहिल शांत झोपल्यावर मात्र सीमाने घरातील सदस्यांसमोर हा विषय काढला. खरं तर सर्वांनाच शेजारच्या काकूंचा राग आला होता; पण आज काकू बोलल्या, उद्या आणखी कोणी बोलेल. जशी समाजात चांगली माणसं असतात, तशी वाईटही असतातच. कोणा कोणासाठी समजावणार.

या सर्वातून विचाराअंती एक तोडगा काढला गेला. हे गाव सोडून पुण्याला राहायला जाणं. सुरेशला काय पण घरातील सर्वांनाच हे जड जाणार होतं; पण साहिलच्या कोवळ्या वयाचा विचार करता हा निर्णय घ्यावाच लागणार

होता. आज या काकू बोलल्या, उद्या अजून कोणी. साहिलच्या कोवळया वयात समाजाकडून त्याला, तू या घरातला नाही असे बिंबवले आणि त्याच्या मनात पक्के झाले तर मग त्याचे पुढचे जीवनच उद्ध्वस्त होईल.

शांत पाण्यात कोणीतरी दगड मारून ते पाणी गढूळ करावं, तशी काहीशी स्थिती सुरेश अन् सीमाची झाली होती. लातूर सोडून पुण्याला जाणे, तेथे नव्याने जीवन सुरू करणे सोपे नव्हते. अनेक संकटांना सामोरे जावं लागणार होतं, परंतु तरीही आपल्या साहिलसाठी त्या छोट्या कोवळया जिवांसाठी ते काहीही करायला तयार होते. कारण साहिल सुरेश- सीमाचा काय पण सर्वांचाच जीव की प्राण होता. सुरेशने पुण्यामध्ये एका मित्राला सांगून नोकरी अन् भाड्याने फ्लॅट घेतला.

अवघ्या दोन तीन महिन्यात ते पुण्यात छान रुळले. सुरेश एका मोठ्या कंपनीत कामाला लागला. बघता बघता अनेक अडचणीवर मात करत आपल्या कुटुंबाची घडी पुन्हा व्यवस्थित बसवली. पुण्यात एक फ्लॅट विकत घेतला. साहिलला मोठ्या शाळेत ॲडमिशन घेतली. भावाची बदली पुण्याच्या आसपास करून घेतली. सुरेशचे आई बाबाही जरा उशिरा का होईना; पण पुण्याच्या वातावरणात रमले. काही महिन्यांनी तो कंपनीत एका विभागाचा प्रमुख झाला. कंपनीने त्याला कार, फ्लॅट राहिला दिले. सुरेश स्वतःच्या फ्लॅटमध्ये राहिला. गाडी तेवढी कंपनीची, सर्वांच्या लक्षात आले की साहिलच्या आगमनाने घरातील सर्वांची प्रगती झाली होती. साहिल म्हणजे सर्वांसाठी यश प्रगती देणारा प्रेरक ठरला. साहिलने आपले अस्तित्व घरातील प्रत्येकाच्या मनात निर्माण केले होते.

# निर्धार

आकाशात ढग दाटून आले होते. दाटलेल्या ढगांची गर्दी पाहता, सलग दोन तीन तास पाऊस सहज पडेल असे वाटत होते. पण जसं मनात एखादी गोष्ट घुसमटत राहावी; पण ओठी ना यावी. असंच काहीसं या ढगांचं झालं होतं. कधी कोसळतील काही सांगता येत नव्हतं. अशा स्थितीतही ते कोसळत काही नव्हते.

रमाला असे वातावरण अजिबात आवडत नसे.

रणवीर सीमेवर नोकरीस लागून बरीच वर्षे झाली होती मध्यंतरी दिवाळीच्या वेळेस सुट्टी काढून तो येऊनही गेला होता. त्याच जाणं तिला आवडत नसे; पण नाईलाज. मातृभूमीसाठी तो प्रसंगी जीवही द्यायला तयार होता. देशप्रमाने ओतप्रोत भरलेले त्याचे मन त्याला सीमेकडे खेचत होते. रमाला हे सगळं मान्य होते. देशाविषयी तिलाही प्रेम वाटत होतं; पण आपल्या संसारात स्थिरता आणि निश्चितता असावी असेही वाटत होते. रणवीर नेहमी तिला समजून सांगे, ही तुझ्या मनातली आकांक्षा सामान्य मनाचे दर्शन घडविते. प्रसंगी देशासाठी प्राणही द्यायला मागेपुढे न पाहणारे आम्ही सैनिक.

आज तिला त्याची आठवण येत होती. दाटलेल्या आकाशामुळे उदास वाटू लागलं होतं, अशात तिचा उजवा डोळा फडफडू लागला. तिने आपल्या गळयातील सौभाग्यालंकार डोळ्याला लावला.

संकेत अन् युक्ता दोघांसाठीही महत्त्वाची वर्षे. बारावी दहावी मधून दोघं पार पडली म्हणजे जीवनाचं ध्येय ठरवून शिकण्याची दिशा ठरवता येईल असे तिला वाटत होते. घरात आबासाहेब सुशीलाबाई अन् हे तिघं. रणवीर नसला तरी घरात पाच माणसं नेमकी होतीच. दिवस कसाही जाई; पण अंथरुणावर पडल्यावर मात्र डोळा लागत नसे. रणवीर काय करत असेल, असा विचार तिच्या मनात येई. दिवसभर काबाडकष्ट केलं तरी पटकन गाढ झोप का लागत नाही, याचं आश्चर्य तिला कायमच वाटत राही.

संध्याकाळचे पाच वाजले तिने पटापट आवरले. एवढ्यात जोरदार पाऊस आला. पावसात भिजतच दोघेही कॉलेजमधून आले. तिने पटकन सगळयांसाठीच गरम भजी तळली. खाण्यासाठी तोंडापर्यंत नेली अन् तिला रणवीरची आठवण आली. भजी खाऊच् वाटेना. पहिल्याच घासाला तिला ठसका बसला. बहुतेक रणवीर संकटात तर नसेल ना, असाही विचार तिच्या मनात येऊन गेला. तिने ताट बाजूला ठेवले अन् हात धुतला.

झाडलोट झाल्यावर देवाजवळ दिवा लावला. आज ती देवा समोर प्रार्थना करीत बसली होती. ती मनोमन रणवीरच्या सुरक्षिततेसाठी देवाकडे मागणे मागत होती. हे सकाळपासून तिचं वागणं सासू सासऱ्यांच्या लक्षात आले; पण त्या संदर्भात

काही बोललं तर आतापर्यंत भावनांचा अडवलेला तिचा बांध कधी फुटेल सांगता येणार नाही, म्हणून दोघंही गप्प होती. मुलं अभ्यास करत बसली आणि आजी आजोबा टीव्ही पाहत बसले. आज पाऊस आला, नाही तर आबासाहेब शेताकडे अन् आजी महादेवाच्या मंदिराकडे जाऊन येत. मालिका बघतानाच आबासाहेबांनी बातम्यांचा चॅनल लावला. बातम्या बघितल्यावर जगातल्या काही महत्त्वाच्या गोष्टी माहित होतात. असं त्यांचं मत होतं; पण सुशिलाबाई मात्र म्हणत,

'काय त्या बातम्या. खून, चोरी, मारामारी दुसरं काही विशेष नसतं त्यात. ' बघता बघता आबासाहेबांनी सीमेवर झालेल्या गोळीबाराची बातमी पाहिली. आबांच्या हृदयात एकदम धस्सं झालं. नशीब सुशीलाबाई पाणी पिण्यास आत गेल्या होत्या. त्यांनी पटकन चॅनल बदलून मालिका लावली.

आज सकाळपासून आबा घरात एकटेच होते. नात नातू दोघंही शाळा, कॉलेजला गेले होते, तर सासू सुना शेताकडं. आबांची तब्बेत ठिक नसल्यानं, त्यांनी आज घरातच विश्रांती घेतली. आता त्यांना बरं वाटू लागलं. सायंकाळी सासू सुना दोघीही परतल्या, मुलंही आली. आबासाहेब मात्र गप्प गप्प होते. वऱ्हांड्यात ते एकसारख्या फेऱ्या मारत होते. त्यांच्या मनाची अस्वस्थता हालचालीवरून लक्षात येत होती; पण ते जास्त कोणाशीच बोलत नव्हते. जेवणाच्या ताटावरूनही दोन चार घास खाल्ल्यासारखे करून ते उठले. तब्येतीचे कारण सांगून जेवण आवरत घेतलं. दिवसामागून दिवस जात होते. आबासाहेबाचे जेवणं, बोलणं सगळंच कमी झाले. पोरांच्या परीक्षेचे दिवस जवळ आले अन् अचानक सुशीलाबाई

आजारी पडल्या. घरातलं, शेतातलं, सुशीलाबाईंचं करता करता रमाची चांगली धावपळ होत होती.

सुशीलाबाईंना अचानक एकेदिवशी अटॅक आला. जिल्ह्याच्या दवाखान्यापर्यंत नेईपर्यंतही त्यांनी साथ दिली नाही. सुशीलाबाईंच्या अशा अचानक जाण्याने रणवीरची अन् त्यांची गाठ पडली नाही. याची रमाला खूप खंत वाटत होती; पण पुढे काही दिवसांनी का होईना ते येऊन आबासाहेबांना धीर देऊन जातील असं वाटलं. रजा मिळत नसल्याचं रणवीरचं पत्र वाचून तिला आश्चर्य वाटलं. त्यातील अक्षर वेगळंच वाटत होतं.

परीक्षा होऊन मुलांचा रिझल्ट लागला. दोघेही फर्स्ट क्लासमध्ये पास झाले होते. आबासाहेबांनी दोघांना त्यांच्या मनाप्रमाणे शिक्षण घेण्यास पूर्ण परवानगी दिली होती. संकेतने डॉक्टर तर युक्ता एमपीएससीच्या परीक्षा देणार होती. त्यांचं शिक्षण सुरू होतंच. बऱ्याच दिवसांनी तिने आबासाहेबांना रणवीरच्या ऑफिसात फोन करायला लावला.

प्रथम आबासाहेब चपापले; पण हो नाही म्हणत त्यांनी फोन लावला; पण फोन लागलाच नाही. सुटलो, अशी भावना त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती.

वर्षामागून वर्ष जात होती. तिला आता कधी एकदा रणवीरला भेटते असं झालं होतं. किती जरी संसारात मन रमवायचा प्रयत्न केला तरी शेवटी नवऱ्याची आठवण येणं, साहजिकच होतं.

मध्यंतरी तिच्या हट्टामुळे आबासाहेबांनी पुन्हा एकदा फोन लावला. तेव्हा त्याच्या साहेबांनी रणवीरला दुश्मनांनी त्यांच्या क्षेत्रात गेल्याने, ताब्यात घेतल्याचे सांगितले. रमाला मोठा धक्का बसला; कारण परकीय सैनिक त्यांची क्रूरता या सर्वांविषयी ती ऐकून होतीच. तिचे खाण्या पिण्यावर लक्षच नव्हते; पण शेवटी संसाराचा रथ कसा का होईना हाकला पाहिजे.

बघता, बघता एके दिवशी आबासाहेब आजारी पडले. त्यांना रमाला खूप काही सांगायचे असावे; पण त्यांना ताप आल्याचे निमित्त झालं आणि त्यांची जीवनयात्रा अचानक संपली.

रमाला आता पोरकं वाटू लागलं. तिने सासऱ्यांच्या दिवस पाण्याकरता घर आवरायला घेतलं. कसं का होईना, कर्तव्य निभावायला हवं. म्हणून ती जबाबदाऱ्या पार पाडत होती. दुश्मनांच्या ताब्यातला नवरा कधी सुटून येईल, म्हणून वाट पाहत होती. पण घोर निराशा होत होती. तिने बऱ्याच वेळा सीमेवर पत्र पाठवली; पण काहीही उपयोग झाला नव्हता. घर आवरताना काही महत्त्वाची कागदपत्रे तिला सापडली. शेतं व घराची महत्त्वाची कागदपत्र होती आणि, आणि ही कसली तार?

तिला सारे घर तिच्या भोवती फिरल्या सारखे वाटलं. म्हणजे आतापर्यंत आबासाहेबांनी आपल्यापासून एवढी मोठी गोष्ट का लपवली? ते तिला समजेना. मन धाय मोकलून रडत होतं. थोड्या वेळानंतर विचार करून मन शांत झालं आणि तिने निर्धार केला. मी कपाळावरचं कुंकू पुसणार नाही. ते सीमेवर लढताना, त्यांना

वीरमरण प्राप्त झालं. मी विधवा नाही. मी सौभाग्यवतीचं आहे. तिने स्वतःच्या मुलांनाही कसलीच कल्पना दिली नाही. सासऱ्यांनी मान्य केलेला निर्णय, तो पुढे ती चालवणार होती जगापुढे रणवीरची सौभाग्यवती बनून जीवनाशी यशस्वीपणे, हिमतीने तोंड देणार होती. तसा तिने ठाम निर्धार केला.

# वाट

‘दोन सालापासनं शेतात काय उगवतच नाय बघा.’

या वाक्यासरशी मी तंद्रीतून जागा झालो.

शिरपा माझ्यापुढं तंबाखूची पुडी धरून घेण्याचा आग्रह करत होता.

माझं मात्र चित्तचं थाऱ्यावर नव्हतं. चार दिसापासनं राजा घराकडं आला नव्हता.

त्या रात्री मी त्याला तेवढी पाण्याची पाळी आपली हाय तर दारं धरू चल म्हणल्यावर ‘ दिसभर कॉलीज अन् बाकीची कामं बघायची पून्यांदा रातीलाबी तू झोपू देत नाय.’ असं म्हणून गुरगुरल्यावर मी जरा बडबड केली. तसा राजा रागातच उठला. अन् ‘गप बाबा आता म्या एकटाच जातो. तू बस इथंच’ मनला. अन् बेन् शेतात निघून गेलं. तो गेल्यावर मला बी डोळा लागला.

थोड्या येळात रातीच्याला कुत्र्यांचा गोंधळ ऐकू आला म्हणून राजा बाजल्यावर येवून झोपला काय. म्हणून बघितलं तर प्वॉर नव्हतंच. घरात बी पाह्यलं, मग कुठं गेलं? गेलं असलं शेजारच्या वस्तीवरच्या गोविंदाकडं अभ्यासाला असं वाटलं म्हणूनशान पुना डोळा लागला.

पहाटं पहाटं कोंबडं अरवलं अन् जाग आली. धारा काढून सर्जाकडं पाठवाव्या. आज लय आळस आल्यासारखच वाटत होतं. या इचाराने उठलो अन् धारा काढायची तयारी झाली. कारभारीनबी उठूनशान कामाला लागलीच होती. तिनंच मला राजा कुठं हाय म्हणून इचारल्यावर अब्यासाला गेलं असलं’ म्हणलं.

'पर त्याचं सकाळी कॉलीज असतयं. आतापतूर यायाला पाहिजे होतं' तिनं असं म्हणल्यावर मी बी इचार कराय लागलो.

बगता बगता सूर्यदेवं बी उगवलं. म्या सर्जाला दूध देवून रतीब घालायं पाठवायच्या आधी राज्याचा मैतर गोविंद्याकडं पाठवलं. गोविंदा दोन दिसापासनं त्याच्या आत्याकडं गेल्याचं कळालं. आतामातूर माज्या पायातलं अवसानंच गेलं. म्या तसंच सर्जाला दुधाच्या रतिबाला धाडलं अन् म्या सोताच जाऊनशान जवळपास शेतात, वस्त्यावर बगून आलो. पर काय उपेग झाला नाय. राजाचा कुठं बी पत्त्याच नव्हता.

त्याला शेतातल्या कामाचा लय कटाळा. चकाचक राहायला लय आवडतं. मातीत हात घालून काम करायचं लय जीवावर. पर या मातीत जी उगवतं त्यातनंच आमचं जीवन उभं राहतंय. त्या काळया आईची कृपा हाय तर सगळं हाय, नायतर काय बी नाय. पाहुण्या रावळयात बी चौकशी केली. पर राजाचा काय पत्त्याच नव्हता.

जी ती माझ्यावरच डाफरत होतं. तुम्ही त्याला रागावलात का? आता वयात आलेल्या पोरावास्नी बोलून चालत नाय. बापाची चप्पल अन् सदरा लेकराला यायला लागला की गप बसावं हीच खरं.

मलातर पुन्हा पुन्हा आठवून बी म्या काय वाईट वंगाळ बोलल्याचं आठवना. एवढं मातूर खरं भर झोपंच्या टायमाला उठवून दारं धर म्हणूनशान पाठवलं. पर दोन दिसापासून त्याच्या बी अंगात ताप भरला होता. त्याच्या कॉलीज मधी बी फी साठी लय झंझट झालं होतं. शेतातनं जायला यायला कॉलीज लांब पडत होतं. अन् कामानं त्याला अभ्यासाला येळ बी मिळना झालता. मला एक दोन येळा त्यानं इनंती बी केली व्हती. म्या एवढं एक वर्ष पार करतो अन् मग नवकरीला लागलू की, सगळी पगार तुमाला घरात देतू. मग तूमी त्या पैशातनं हिर खांदा नाय तर काय बी करा.

तसं राजा पयल्यापासनं राजा माणूस. दहावी- बारावीला साळंत पहिलं आलतं म्हणूनशान मास्तर करायचं ठरवलं. परिस्थिति नव्हती तरी बी दुसऱ्याच्या शेतात सालगडी म्हणून राहूनशान आयुष्य घालवलं व्हतं. सर्जा आता दहावीत व्हता. गरीबाच्या नशीबात कष्टाशिवाय काय बी नसतंय. इचाराच्या तंद्रीत असतानाच शिरप्यानं तंबाकू दिली.

शिरप्यालाबी राजा घरात नाय ही माहितंच झाल्तं. आता या चार दिसात दोन लेकी, पावणं रावळं सगळं मिळून नाय तत बघून आलो. मनात तर लय वंगाळ येवूनशान गेलं. शेतात बी कानाकोपरा धुंडाळला. घरच्यांनी तर अन्नपाणीच सोडलं. राजा घर सोडून गेला अन् घराला अवकळा आली. घरात कुणालाबी अन्नपाणी ग्वाड लागना. पोरीबी भाऊ घरातनं गेला म्हणून कळल्यापासनं माहेरी आल्या व्हत्या. त्या व्हत्या म्हणून घरात स्वयपाक पाणी होत होतं. नायतर कारभारीण अन् मी पाक कामातनच गेलू होतू. देवरूषी, बामण अन् लय जणाचं सल्लं घेतलं. कोण काय म्हणल तसं आमी करत होतो. कधी कोणती दिशा तर कधी कोणती. सर्जा अन् त्याचं भाऊजी लोकं तर पायाला भिंगरी लावल्यागत फिरत होती. पर पत्त्या म्हणून लागत नव्हता.

राजा गेला त्याला बघता बघता आता महिना झाला. आमची दररोजची कामं चालूच व्हती. पर चित्तं काय थाऱ्याला नव्हतं. पोरानी एवढी राख डोक्यात घालायसारखं काय झालं? आपण बोलताना एखादा शबूद जादा गेला तर येवडं मनाला लावून घ्याचं कारण नव्हतं. पर आजकालच्या पोरांना बोलायचं म्हंजी लई अवघड.

दिसामागनं दिस अन् महिनं जात व्हते. परवाच्याला शिरप्यानी राजाला शहर गावाला एका कारखान्यात काम करताना बगितलं. त्यानं त्याचा पाठलाग केला. त्याच्या लक्षात आलं अन् ती तितनंबी गायब झालं.

देवरूषी, गंड दोरं, पावणं रावळं सगळं करून थकून गेलू. सगळया परिस्थितिपुढं म्या तर हात टेकलं. त्याच्या आईचं बहिणीचं अन् बहिणीचं अन् भावाचं बी ती गेल्यापास्नं चित्तं थाऱ्याला नाय. तसं तर राजाला बी आमच्या बिगर करमत नसल. अन्नपाणी ना त्याला गोड, ना आमाला गोड. आता पतूर राजा बिगर घरात काय बी व्हत नव्हतं ; पर आता नाईलाज झाल्ता. येळ काय कुणासाठीबी थांबत नाय.

राजाच्या मामाचं दोन दिसाखाली पतूर आलं अन् आमी सगळी आनंदानी खुळं झालू. त्याला मन शहरात राजा भेटला. आता काम करत करत पुढचं शिक्षण पूरं करणार हाये. शहरातल्या कामाचा, वातावरणाचा, आपल्या परक्या माणसाचा बी अनुभव लई महत्वाचा असतो. पोरानं मामाजवळ सांगावा बी धाडलाय. म्या सोताच्या पायावर हुभारल्या बिगर गावाकडं येणार न्हाय. त्यालाबी जड जात असन पर लय जिद्दी हाय नव्हं. आमी साऱ्यानी त्याला भेटायचं ठरवलं. पर त्यान भेटणार नाय म्हणून सांगावा धाडला. कॉलीजात मामाबरूबर जावून सर लोकास्नी अडचण सांगून आता परत कॉलीजला जाया लागला.

माजं मन इचारांनी भरून आलं. नदीचं पात्र तुडूंब भरून वहावं तसं झालं. राजाच्या जन्मापासनं आतापतूरचा त्याचा जीवन परवास माज्या डोळ्यासमूर हुभा राहिला. ‘राजा, राजा तू राजाच हायेस. पर आमच्या मनाची दैना करू नगस. लवकर पायावर हुभा रहा अन् घराची वाट धर. तू येईपतूर घर म्हंजी लुटलेलं राज्य हाय. तू कधी तर येणार हायेस, असं कळल्यापासन् जीवनात राम वाटाय लागला. नायतर तुझ्या मायला अन् मला जगायला नकू वाटतं व्हतं. ‘

तरीबी कारभारीण अन् पोरी जावून भेटून चौकशी करून, समजूत घालून आली. पोरगं लई शरमलं पर जिद्दीवर अडलं. म्याही लांबूनच बगून आलो. ये मनलं जवा तुझी विच्छा होईल तवा. या पोरास्नी आई-बा चं मन कळायला सोता आई बाप व्हावं लागंन. किती तरास व्हतो यांच्या वागण्याचा. आमच्या घासातला घास देतो आमी. तरीबी सगळं इसरत्याती. कधी का व्हईना तो येणारच, याच आशेवर आमी जगतो. परत्येक दिशी त्यो येईल म्हणून माझी कारभारीण अन् मी त्याच्या वाटंला डोळं लावून बसतूया.

कधी ना कधी वाट चुकलेलं आमचं कोकरू घराकडं परतणार याची वाट बघतूया.

# नशीब

मुलांच्या वार्षिक परीक्षा सुरू झाल्या होत्या. तिला सुपरव्हिजन करण्यासाठी नववीचा वर्ग होता. तिने हेडबाईंनी दिलेल्या सूचनांप्रमाणे सर्व तयारी केली. सकाळी आठ वाजता पेपर होता. घरातून निघताना आज खूपच घाई झाली होती. छोटा शशी प्ले गटात तर मोठा अक्षय पहिलीला. तिच्या नवऱ्याचे म्हणजेच नरेंद्रचे कॉलेज सकाळी आठला. सर्वजण एकदमच बाहेर पडत. सकाळी शशी उठताना खूप सतावत असे. कधी कधी तो बाबांकडूनच अंघोळ करणार म्हणून हट्ट धरे. नाइलाजाने नरेंद्र त्याचे सर्व करी. अक्षय त्या मानाने समजूतदार होता. अक्षय अगदी तिच्यावर गेला होता. संपदाला नेहमी त्याचा अभिमान वाटे. तसेच शशीचेही कौतुक वाटे. तिच्या संसारात नरेंद्रने रंग भरला होता; पण अक्षय आणि शशीने, तिचं जीवन सप्तरंगी केलं होतं.

आज सकाळी शशी काही केल्या उठेना आणि शाळेला जायला तयार होईना. त्याला घरात एकटे कसे सोडायचे. परीक्षेचे दिवस, त्यामुळे अचानक रजा कशी काढायची. शेवटी संपदाने त्याला संध्याकाळी आपण गार्डनला जाऊ. वगैरे, वगैरे गोड बोलून सांगून त्याला शाळेत जायला तयार केले.

नरेंद्र कधी नव्हे तो आज त्याच्यावर चिडला होता. पंधरा दिवसांपूर्वी छातीत दुखतंय म्हणून नरेंद्रने शाश्वत रुग्णालयातून सर्व तपासण्या केल्या होत्या. रिपोर्ट नॉर्मल आले, तरीही मला कसंतरीच वाटतंय, असं त्याने संपदाला सांगितले होते. आपण रजा घेवून दुसऱ्या दवाखान्यात दाखवू असं तिनं सांगितलं. शेवटी दोन

तीन दिवसांच्या गोळयांच्या कोर्सनंतर, त्याला थोडा आराम वाटू लागला. पंधरा दिवस झाले, आता तो चांगलाच नॉर्मल वाटू लागला होता. फक्त त्या दिवसापासून त्याला जास्त ताण सहन होत नव्हता. तो चिडचिडा झाला होता.

आज सकाळी संपदाने त्याला चिडल्यावर, 'शांत व्हा. असे चिडून काय उपयोग' असं सांगून दोन मिनिटं शांत बसायला लावलं. पाणी प्यायला दिले. त्याला दरदरून घाम सुटला होता. आता थोडं बरं वाटू लागल्यावर, सगळेच घराबाहेर पडले. दररोजपेक्षा पाच दहा मिनिटं उशीरच झाला होता. संपदा शाळेत आली आणि सुपरविजनचा वर्ग बघून वेळ वही आणि शिक्षक हजेरीत सही करून घाईघाईने ती वर्गात गेली.

पेपर सुरू होऊन पंधरा वीस मिनीट झाली असतील, एवढ्यात मोबाईल वाजू लागला. आपल्या मोबाइलमुळे मुलांना व्यत्यय झाला म्हणून इतक्या सकाळी कंपनीशिवाय कुणाचा फोन असणार असं समजून तिने फोन स्वीच ऑफ केला. विद्यार्थी पेपर व्यवस्थित लिहित होते. शेवटची दहा मिनिटे राहिले, वॉर्निंग बेल पडली. एवढ्यात ताटे सर पळतच वर्गावर आले. 'मॅडम, फोन, फोन कुठाय तुमचा?'

' आहे ना. का हो?'

' अहो, तुमचा फोन लागत का नाही?'

'अहो मुलांना व्यत्यय नको म्हणून मीच पेपर सुरू झाल्यावर कुठल्यातरी एक फोन आला. तेव्हाच स्वीच ऑफ केला. '

' फोन कोणाचा होता?'

असे ताटे सरांनी विचारल्यावर,

‘ असेल कंपनीचा. ‘

असे तिचे उत्तर ऐकून ताटे सरांच्या चेहऱ्यावर काळजी दिसू लागली. संपदाला पेपर घ्यायचे होते. म्हणून ती विद्यार्थ्यांकडे वळली. एवढ्यात ताटे सर म्हणाले,

‘ शेजारच्या वर्गात सुर्वे मॅडमला पेपर घ्यायला लावतो. तुम्ही माझ्या बरोबर चला. ‘

त्यांच्या बोलण्याने ती गोंधळात पडली. हे मला कुठे घेऊन जाणार, काय भानगड आहे. ताटे सर म्हणजे नरेंद्रच्या अगदी जवळचा मित्र. त्यांच्या ओळखीने संपदा येथे नोकरीला लागली होती. ताटे सरांनी फक्त तिला एवढेच सांगितले, ‘नरेंद्राला शाश्वत हॉस्पिटलमध्ये नेलं आहे. ‘

आणि ते भरभर चालू लागले. संपदाने घाईघाईत फक्त सुर्वे मॅडमला,

‘ पेपर घ्या.’

असे सांगितले आणि हेडमॅडमला मी दवाखान्यात मिस्टरांना ॲडमिट केलंय म्हणून जाते. एवढंच सांगून ती ताटे सरांच्या मागे मागे चालत नव्हे तर पळतच रिक्षात बसली. अवघ्या वीस -पंचवीस मिनिटांनी हॉस्पिटलला पोहोचली. रिक्षात तिच्या मनात चांगले वाईट सर्व विचार येऊन गेले. ताटे सरांना तिने भरपूर

प्रश्न विचारून भंडावून सोडले. ‘तुम्हाला कसे कळले? कोणी सांगितले? केव्हा कळले? नक्की काय झाले?’

या सर्वांची उत्तरे देता, देता ताटे सरांना नाकी नऊ आले होते.

‘ वहिनी, नरेंद्रला हॉस्पिटलमध्ये दाखल करून दोन तास झाले. ‘

असे त्यांनी सांगितलं. त्या वेळेस संपदाला आश्चर्य वाटलं. आपल्याला कसं काय कळवलंही नाही आणि पुन्हा तिची प्रश्नांची बरसात सुरू झाली.

एवढ्यात हॉस्पिटलसमोर रिक्षा थांबली. हॉस्पिटलमध्ये संपदाचा भाऊ, वहिनी, आई- वडील, सासरे, दीर नुकतेच पोहोचले होते. नरेंद्रला आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले होते. तो गेले दोन तासांपासून बेशुध्द होता.

नक्की काय झाले होते? संपदाचा गोंधळलेला चेहरा तिच्या भावाने पाहिला. तो तिच्याजवळ येत तिला काही बोलणार, तर प्रथम तिने नरेंद्रला भेटायचे म्हणून सांगितल्यावर. तिच्या भावाने तिला लांबूनच नरेंद्रला दाखविले. तिला आता रडू आवरणे कठीण झाले. त्याच्या हाताला सलाईन, नाकात कृत्रिम ऑक्सिजन आणि बरीच यंत्रणा त्याच्या शेजारी सुरू होती. एक नर्स त्याच्या शेजारी उभारून काही तरी लिहित होती.

नेहमी हसतमुख आनंदी असणाऱ्या नरेंद्रची ही अवस्था पाहून संपदाने रडायला सुरुवात केली. तिला तिच्या भावनांना आवर घालणे शक्यच नव्हते.

शेवटी राजूच्या गळयात पडून ती मन मोकळं करून रडल्यावर, तिला शांत करत राजूने बाहेर आणले.

‘ह्यांना इथे कुणी आणले? नक्की केव्हा त्रास झाला?’

या सारख्या अनेक प्रश्नांना उत्तर फक्त ताटे सरांकडे होती. ताटे सरांनी खिशातील एक कागद काढून सर्वांसमोर धरला त्यावर काही तरी आकडे अगदी गचाळ अक्षरात लिहिले होते. संपदा यावर ताटे सरांकडे आश्चर्याने पाहू लागली.

ताटे सरांचा अमोल पवार नावाचा मित्र नरेंद्रच्या कॉलेजमध्ये लेक्चरर आहे. सगळेजण एकाच रस्त्याने गाड्यांवर कॉलेजला जातात. आज अमोल पवारलाही उशीर झाला होता. रस्त्यावरून जाताना एकदम ट्राफिक जाम झाले होते. ‘दुष्काळात तेरावा’ म्हणत ते गाडीवरून उतरून काय झाले ते बघायला गेले. तर कुणाचा तरी अपघात नव्हे, वेगळंच काही तरी घडलं होत. शेवटी तो नुसतं बघून तरी घेऊ; म्हणून गेला. ‘पोलिसांना पण काय समजतच नाही. सकाळी पटकन गर्दी हटवायची. लोकांना भरपूर काम असतात आणि यांचं आपलं निवांत. ’ असं म्हणत तो गर्दीपाशी आला आणि हादरलाच. नरेंद्र, नरेंद्र शहाणेच होता तो.

‘अरे, माझ्या बरोबर लेक्चरर आहे हा. याला काय झाले?’

असं म्हणत तो गर्दीत शिरला. पोलिस लगेच ओरडले.

‘ओ साहेब, हात नका लावू. कोण तुम्ही? ओळखता का यांना?’

लगेच स्वतःची आणि नरेंद्रची ओळख सांगितली. स्वतःचे आयकार्ड तसेच नरेंद्रच्या खिशातले आयकार्ड दाखविले. नरेंद्रच्या शेजारीच एक माणूस उभा होता. जो प्रत्यक्षदर्शी होता. त्याने मग पवार सरांना सर्व माहिती सांगितली.

‘ ही व्यक्ती गाडीवरून चालली होती. मी रस्त्याच्या कडेने निघालो होतो. गाडीचा वेग हळू हळू कमी करत या व्यक्तीने गाडी बाजूला घेतली. गाडी रस्त्याच्या कडेला कशीबशी लावून, त्यांनी फ्लॅटफॉर्मवर चढत मोबाइल काढला. ते घामाने भिजून गेले होते. हात थरथर कापत होते. त्यांना उभे रहावेना. तेवढ्यात ते मोबाइलचे बटन दाबायचा प्रयत्न करत होते; पण ते त्यांना जमेना. मी धावतच जवळ गेलो. अहो, मिस्टर काय होतंय? असे विचार ल्यावर, त्यांनी कागद पेन द्या अशी खूण केली. त्यांच्या खिशातला पेन, कागद मी त्यांना काढून दिला. त्यावर थरथरत्या हातांनी त्यांनी एक नंबर लिहिण्याचा प्रयत्न केला. पहिले पाच- सहा नंबर बरे आले; पण त्यापुढे काहीच कळेना. एवढं लिहून माझ्या हातात दिले. मी कागद पाहात होतो. एवढ्यात छातीला हात लावून, ‘आई’ म्हणून ते खाली कोसळले. त्यानंतर गर्दी, पोलिस, सर्वजन जमा झाले. ‘

नरेंद्रने लिहिलेला फोन नंबर कळेना म्हणून शेवटी त्याच्या मोबाइलमधील रिसीव्हर नंबरमध्ये ताटे सरांचा फोन होता. त्यांनाच फोन करून पवार सरांनी सर्व कळवले. ताटे सरांनी आदल्या दिवशी रात्री सहज फोन केला होता. कॉलवरून पोलिसांना धागादोरा सापडला. ताटे सर कॉलेजमध्ये अर्धी रजा काढून, त्यांच्या मुलीला पेपरला सोडवायला जाणार होते. सरांनी सर्वप्रथम

संपदाला फोन केला; पण संपदाने फोन कट केला, नव्हे तर फोन स्वीचऑफ केला. नंतर ताटे सरांनी सर्वांना पटपट करवून हॉस्पिटलला बोलावून घेतले. नरेंद्रने संपदाचा नंबर कागदावर लिहिला होता. त्याने स्वतः फोन करण्याचा प्रयत्न केला; पण काहीच उपयोग झाला नाही. '

संपदाला सर्व ऐकून खूप वाईट वाटले. सकाळचा सर्व प्रसंग तिने सर्वांना सांगितला. शशीचा हट्टीपणा वगैरे, वगैरे. वहिनींना एकदम लक्षात आले. मुलं कुठं आहेत, मग संपदाने आई- वडील, सासऱ्यांना घरी पाठवले. वहिनींना तेवढे सोबत ठेवून घेतले. राजूला मुलांना आणायला पाठविले. दवाखान्याची सर्व प्रोसिजर ताटे आणि पवार सरांनी पूर्ण केली होतीच.

गेले आठ दिवस नरेंद्र आय. सी. यूमध्ये होता. त्याला भेटायला येणारे त्यांचे सहकारी आणि पाहुणे रावळे या यामुळे संपदाला मानसिक आधार मिळत होता. नरेंद्रच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होऊ लागली.

तो आता थोडं थोडं बोलत होता. तिला सारखं तू जवळ बस, कुठे जाऊ नकोस. मला कसंतरी वाटतंय असं सांगत होता. शशी आणि अक्षयचीही सारखी आठवण काढत होता. मधल्या अचानक घडलेल्या प्रसंगामुळे तिच्या संसारातील सप्तरंग पाणी पडल्यावर जसे चित्रातील रंग दिसतात, तसे दिसू लागले होते; पण प्रकृतीत होणाऱ्या सुधारणेमुळे तिच्या संसाररूपी आकाशात आशेचं इंद्रधनुष्य दिसू लागलं होतं. एकदा शशीने, मला बाबांना भेटायचे म्हणून हट्ट सुरू केला. शेवटी

नाइलाजाने दोघांनाही दवाखान्यात आणून बाबांना दाखविले. शशीला बाबांची ती अवस्था बघवेना. तो सारखा

'बाबा उठा ना! घरी चला ना! माझं कोण करणार सगळं? माझा अभ्यास कोण घेणार? मी त्रास देतो म्हणून तुम्ही इथे येऊन राहिला ना! मी आता तुम्हाला कधीही त्रास देणार नाही. तुम्ही चालना, मी तुम्हाला त्या दिवशी त्रास दिला म्हणून तुम्ही रागावलात ना, सॉरी. '

असं म्हणून तो कान पकडून उठा बशा काढू लागला. हे सर्व पाहून नरेंद्र च काय; पण संपदालाही रडू आवरेना. नेहमी शांत असणारा अक्षयही,

'बाबा, चला ना घरी. '

म्हणून रडू लागला. शेवटी संपदाने सर्वांना शांत केले. एवढ्यात नर्स आली आणि

'मॅडम पेशंटला त्रास होतोय, बाहेर चला. '

म्हणून सांगून गेली. सर्वजन बाहेर चालले एवढ्यात अक्षयने बाबांजवळ जाऊन बाबांचा हात हातात घेऊन,

'लवकर बरे व्हा!'

म्हणून सांगितले. तर शशीने बाबांचा पापा घेतला.

'तुम्ही घरी लवकर नाही आला तर कट्टी. '

म्हणून तो आईकडे आला. बाबांनी आपले मन कसे तरी आवरून लवकरच मी घरी येतो असं म्हणून हसून सर्वांना बाय केले.

मुलं भेटून गेली, संपदाने मुलांना वहिणीबरोबर घरी पाठवले. संपदाला पाहून नरेंद्रपेक्षा तीच आजारी आहे, असे वाटत होते. काळजीने चेहरा काळवंडला होता. चेहऱ्यावर चिंतेचे भाव दिसत होते. डॉक्टर नरेंद्राला काय झाले ते संपदाला स्पष्ट सांगत नव्हते. फक्त बघू दोन चार दिवसांत सोडूया, असे म्हणत होते. राजू, अमोल सर, ताटे सर या सर्वांना बोलावून डॉक्टरांनी स्पष्ट काय ते सांगितले होते. मानसिक तणावामुळे मेंदूची शीर तुटून ब्लॉक झाला होता आणि त्यामुळे एक भागातील शक्ती जाता जाताही वाचली होती. तरी केस एक टक्का हातात होती. देवावर श्रद्धा भक्ती विश्वास हे सर्व काम नव्यानऊ टक्के होते.

संपदाला नरेंद्रच्या दिसण्यात फरक जाणवत होता. तो पहिल्यासारखा वाटतच नव्हता. त्याचं सर्व नर्सच करत होत्या. त्यामुळे फक्त शेजारी बसणे एवढेच ती करत होती. जेवण खाऊ घालणे, अंग पुसणे, गोळ्या देणे सर्व कामे नर्स करत होती. तरीही संपदाला त्याच्या शरीराला बदल लक्षात येऊ लागला. तो सहसा बोलताना एकच हात हलवे. पायाची तिढी एकाच पायाने घाले. त्याला एकट्याला अडंग बदलायला येत नसे. तिला हा सर्व सलाईन व ठिकठिकाणी लावलेल्या नळयांचा परिणाम वाटला होता; पण आता हे वेगळं काहीतरी आहे, हे जाणवलं. यासाठी तिने मुद्दाम नरेंद्रच्या उजव्या हाताजवळ जाऊन, हा देवाचा प्रसाद. तुझ्यासाठी म्हणून आणलाय. म्हणत हातावर देण्यासाठी हात पुढे केला, तर त्याने

डावा हात उचलला. तिने प्रसाद उजव्या हाताने घ्या, म्हणून हाताकडे निर्देश केल्यावर हात उचलला गेला नाही. त्याच्या डोळयातून अश्रू वाहू लागले. संपदा काय समजायचे ते समजली. तिने स्वतःच्या अश्रूंना मात्र आवर घातला. हसत हसत ती म्हणाली,

‘ अहो, मी असताना तुम्हाला स्वतः खाण्याची काय गरज. ‘

म्हणून स्वत: च प्रसाद त्याच्या तोंडात दिला. त्याचे अश्रू पुसून, लवकर बरे व्हाल, धीर ठेवा असे म्हणून मी आलेच. म्हणत ती घाई घाईने बाहेर आली आणि वहिनींच्या गळयात पडून रडली.

‘ वहिनी, काय नशिबात आहे कोणास ठाऊक?’

यावर वहिनींनी संपदाला धीर दिला, शांत केले. जे होणार ते बदलता येत नाही परंतु आपण धैर्याने तोंड दिले पाहिजे,

असे सांगितले, शांत केले. कालपेक्षा आज प्रकृती सुधारल्या सारखी वाटली. परंतु पेशंट कशाचं तरी टेन्शन घेतोय. असे डॉक्टरांनी नातेवाईकांना बोलावून सांगितलं. कोणीही पेशंट जवळ जाऊन जास्त वेळ थांबायचं नाही, रडायचं नाही आणि अशा बऱ्याच सूचना सांगितल्या. नरेंद्राला संपदाचा आणि अक्षय शशीचा विचार डोक्यात येत होता. तसं त्याने ताटे आणि पवार या दोघांजवळ बोलून दाखवलं होतं; पण तो लवकर बरा होईल. वहिनी व मुलांची काळजी करू नकोस अस, ते त्याला समजून सांगत.

आता संपदाला तू घरी जाऊन विश्रांती घे. तुलाही माझ्यामुळे त्रास होतोय म्हणून जवळजवळ जबरदस्तीने नरेंद्रने घरी पाठवले. उद्या येताना माझ्या आवडीची साडी, केसात गुलाबाचं फूल, सिंदूर आणि हात भरून हिरव्या बांगड्या घालून ये. उद्या तुझा वाढदिवस, माझ्या लक्षात आहे. म्हणून त्यांनी संपदाला सांगितले.

संपदाचा वाढदिवस साजरा करायचा कोणालाच मूड नव्हता; पण शेवटी नरेंद्रच्या इच्छेखातर तिला सर्वच करावे लागणार होतं. तिला मागील सात आठ दिवस आठवले. नरेंद्रचं व्यक्तिमत्त्व असं होतं की, त्यांच्या बोलण्यामुळे, वागण्यामुळे, दिसण्यामुळे लोक त्यांच्याकडे आकर्षित होत. साधं दूध आणायला दुकानात गेला तरी, ती दहा मिनिटांच्या कामाला अर्धा तास लागायचा. त्याला कोणी भेटले नाही, बोलले नाही असे शक्यच नाही. संपदा त्याच्यावर चिडली की, स्पेशल स्टाइलमध्ये राग काढण्याच्या पद्धतीमुळे, ती त्याच्यावर जास्त वेळ रागावू शकत नव्हती. तो मुलांसोबतही मित्र होऊन खेळत असे. मस्ती करणे, लपाछपी खेळणे, क्रिकेट खेळणे आणि बरंच काही.

आई- बाबांचीही वेळच्या वेळी काळजी घेई. महिन्या दोन महिन्याला गावाकडे जाऊन त्यांना, काय हवं, काय नको ते पाही. गावातच भाऊ होते. यांच्याकडे जाणं येणं होतंच. सासू -सासऱ्यांशीही तो आदराने वागे. राजू त्याचा मेव्हुणा त्याच्याबरोबर तो अनेक गोष्टी शेअर करे, जणू तो त्याचा मित्रच आहे. संपदाच्या दर वाढदिवसाला ते गार्डनला जात. थोडे वर्ष दोघांनंतर तिघांनी नंतर

चौघे एकत्रित मजा लुटत. सिनेमा आणि नंतर नरेंद्रच्या पसंतीची साडी. शेवटी हॉटेलमध्ये जेवण. तिच्या एकटीचाच नव्हे तर घरातील सर्वांचेच वाढदिवस धुमधडाक्यात साजरे होत.

सध्याही तिने दुसऱ्या दिवशी नरेंद्रने म्हणल्याप्रमाणे सर्व आवरले. आज योगायोगाने घरामध्ये संपदांची वहिनी, तिची आई, सासूबाई, नणंदबाई होत्या. संपदा सर्वांच्या पाया पडली. सर्वांनीच आशीर्वाद दिले. ‘ कुणी सुखात रहा, तर कुणी अखंड सौभाग्यवती भव, तर कुणी अष्टपुत्र सौभाग्यवती भव. ‘ यावर संपदाच्या सासूबाई म्हणाल्याच,

‘ दोन मुलातच संपदा वैतागली. राहिलेले अर्धा डझन कोण सांभाळणार?’

यावर सर्वजण हसले. संपदाने डबा वगैरे घेतला व ती वहिनींना घेऊन हॉस्पिटलला गेली. तिला एवढं आवरून घेऊन हॉस्पिटलमध्ये जायचं म्हणजे कसंतरीच वाटत होतं; पण शेवटी नरेंद्रची इच्छा म्हणून जाताना तिने बरोबर पेढेही घेतले. त्या दोघी निघाल्या होत्या, एवढ्यात राजूचा म्हणजेच नरेंद्रच्या मेहुण्याचा फोन आला.

‘ डॉक्टरांना संपदाशी काही तरी बोलायचे आहे. ‘

तसं तर संपदा नरेंद्र ॲडमिट झाल्यापासून कालच पहिल्यांदा घरी गेली होती. तशी तिची घरी जाण्याची इच्छा नव्हती. त्या दोघी दवाखान्यात पोहोचल्या. नरेंद्र उजव्या हाताची थोडीफार हालचाल करू लागला होता. त्याने

तिला जवळ बोलावून घेतले. तू छान दिसतेस असे सांगितले. राजूकडून त्याने संपदासाठी गजरा आणि देवीला नारळ फोडून प्रसाद व देवीचे कुंकू मागून घेतले होते. गजरा व प्रसाद उजव्या हाताने त्याने हातात दिला. ते देताना त्याचा हात थरथर कापत होता.

एवढ्यात नर्स संवादासाठी डॉक्टरांनी बोलावल्याचा निरोप घेऊन आली आणि ती डॉक्टरांकडे जायला वळणार, एवढय़ात नरेंद्रने तिच्या पदराचे टोक हातात धरल्याने तिच्या पदराला ओढ बसली. तिने नरेंद्रकडे पाहिले, तो बोटांच्या चिमटीत कुंकू घेवून तिला लावणार होता. संपदाने सहज त्याच्या पुढे वाकून कुंकू लावून घेतले. त्यांच्या पाया पडली. त्याला पेढा भरवला, त्याच्याकडूनही खाल्ला.

मी आलेच जाऊन असं म्हणत ती निघणार एवढ्यात ईसीजी मशीनवर त्याच्या छातीचे ठोके वाढल्याचे दिसू लागले. त्याला एसीमध्ये दरदरून घाम येऊ लागला. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून ती घाबरली. नर्स, डॉक्टर म्हणून जोराने ओरडून तिने बोलावले. त्याला कळ सोसवेना; म्हणून की काय त्याने तिचा हात धरून तो आपल्या छातीशी घट्ट धरला. तो एकसारखा संपदा, शशी, अक्षय एवढेच शब्द बोलत होता. त्याच्या पुढचे त्याच्या त्रासामुळे त्याला बोलवेना. त्याचं अंग थंड पडते असं तिला वाटू लागलं. डॉक्टर नर्स येऊन उपचार सुरू झाले. तिला बाहेर जायला सांगितले. तो हात सोडायला तयार नव्हता; पण नाईलाजाने तिला तो सोडवून घ्यावा लागला.

तो तिच्याकडे डोळे उघडून बघू लागला. बघता बघता त्याच्या हाताची पकड सैल झाली आणि तो एकटक तिच्याकडे बघत होता. ती आता बाहेर

जाण्यासाठी वळणार एवढ्यात ईसीजी च्या मशिनचा टी...टी... आवाज, सरळ रेषेत चाललेला आलेख, त्याचे थंड पडलेले शरीर आणि डॉक्टर नर्स यांच्या मंदावलेल्या हालचाली, तिच्या लक्षात आल्या आणि

'नरेंद्र'

म्हणून तिने हाक मारली. नरेंद्र एक ना दोन, एकही शब्द बोलला नाही. तो तिच्यापासून खूप दूर गेला होता. कधीही विसरता येणार नाही अशी वाढदिवसाची भेट त्याने दिली होती. आज तिचं रूप त्याने सजवल्यामुळे काही क्षणापूर्वी फुललं होतं खरं; पण क्षणार्धात सर्व होत्याचं नव्हतं झालं आणि तिच्या संसाराचं चित्र रंग उडाल्यासारखं भासू लागलं.

महिना उलटून गेला तरीही संपदाला काहीच कळेनासे झाले. अक्षय थोडा समजूतदार होता; पण शशी तो एकसारखा

'बाबा केव्हा येणार?'

म्हणून रडत असे. त्याला आजी ने समजून सांगितले होते. बाबा देवाघरी गेले आहेत. चांगली माणसं देवाला खूप आवडतात. म्हणून देवाने बाबांना बोलावून घेतले. यावर तो गप्प बसे; पण कधी कधी

'चल ना आजी आपण देवाकडे जाऊन बाबांना भेटून येऊ. '

असाही हट्ट करे. प्रत्येकाला आपल्या भावना आवरून डोळयात अश्रू लपवणे अवघड जात असे. एके दिवशी संपदाकडे राजू व वहिनी आले होते.

वहिनीबरोबर ऋषी चांगलाच रमत असे. खेळता खेळता वहिनींना संपदांचे वडील म्हणजे तिटे सासरे आल्याचे दिसले. म्हणून ती

‘ शशी, बाबा आले बघ. ‘

असे म्हणाली. या वाक्यासरशी शशी पळतच खोलीतून बाहेर आला.

‘कुठे आहेत बाबा, आई बाबा कुठे आहेत. ‘

यावर संपदा व वहिनींच्या झालेला प्रकार लक्षात आला. शशी मात्र जोर जोरात रडू लागला.

‘ मला बाबांना भेटायचे. आताच बाबा आले मग कुठे आहेत ?’

त्याला समजावूनही सांगणे कठीण होते. अवघ्यां चार वर्षांच्या शशीला, बाबा खूप लांब निघून गेले, कधीही परत न येण्यासाठी. हे कळणं शक्यच नव्हतं. वहिनी त्याला समजावून सांगत होत्या. एवढ्यात संपदा जाऊन फोटोसमोर उभारून रडू लागली. अक्षयने येऊन आईचा हात हातात घेतला आणि तो म्हणाला,

‘ अगं आई, असे रडू नकोस. बाबांना तू किंवा शशी किंव्हा मी रडले की वाईट वाटेल. तू रडू नको तू रडली की मलाही रडू येते. शशीही रडत बसेल. ‘

तिला अक्षयचे कौतुक वाटले. त्याला जवळ घेत ती म्हणाली,

‘ मी रडणार नाही बाळा. बाबांना आपण कधीच त्रास द्यायचा नाही. ‘

एवढ्यात शशीही आईजवळ येऊन तिच्या गळयात पडला. त्या दोघांना जवळ घेऊन ती फोटो पाहत होती. तिचं नशीब तिला कुठून कुठे घेऊन आले होते. ती फक्त जीवनाच्या रंगमंचावर एक खेळणं होती. ज्याप्रमाणे दिशा मिळेल तसे जीवन ती जगत होती. काही वर्षांपूर्वी मनमोहक रंगांनी भरलेला तिचा संसार आता उधळून दिलेल्या रंगांप्रमाणे विखुरला होता. तिच्या संसाराच्या रंगाचा बेरंग झाला होता. पण तरीही मुलांच्या साथ- संगतीने पुन्हा ती संसाराच्या चित्रात पुन्हा रंग भरण्याचा प्रयत्न करणार होती.

# उद्ध्वस्त

सकाळी सकाळीच शकुंतलाचा राहिला फोन आला शकुंतलाची मावस बहीण रसिका आयसीयूमध्ये ॲडमिट होती. शकुंतलाला फोनवर बोलताही येईना. शकुंतलाने राहिला काही दिवसांपूर्वी रसिकाच्या आजारपणाची कल्पना दिली होती रसिका नावाप्रमाणेच रसिक वृत्तीची. आरोग्य पर्यावरण कला अशा अनेक क्षेत्रात हातखंडा असलेली. ती योगा स्वतः करतच होती; पण इतरांनाही प्रोत्साहन देत होती. म्हणून तिने सखी ग्रुप तयार केला होता. या ग्रुपमधल्या सखी मिळून दररोज सकाळी एक तास योगा करत. तिच्या बरोबर ती सर्वांनाच आरोग्यपूर्ण राहण्यासाठी योगा क्लासच्या वेळी आहाराचीही माहिती देत होती. अशा या रसिकाला ब्रेन ट्यूमर व्हावा, ही धक्कादायक आणि आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट होती. पूर्वी रसिका स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन करत होती. आजपर्यंत तिचे कितीतरी विद्यार्थी जीवनात यशस्वी झाले. मोठमोठ्या पदावर यशस्वीपणे कार्यरत होते. तिच्या शिकवण्याच्या आदर्श पद्धतीमुळेच तिचा क्लासचा टीचिंग ग्रुप प्रत्येक गोष्टीत तिचा सल्ला घेत असे. रसिका आपल्या क्लासच्या ठिकाणीच काय पण घराशेजारील लोकांनाही चांगले सहकार्य करीत असे. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांमधील ठराविक विद्यार्थ्यांची ती स्वतःही फी भरत होती. तिच्या पगाराची तशी घरात गरज नव्हती; कारण रसिकाचे मिस्टर बँकेत कॅशिअर होते. रसिकाला एक मुलगा व एक मुलगी. दोघेही अतिशय हुशार संस्कारशील आणि सुस्वभावी. मुलगा इंजिनीअरिंगच्या दुसऱ्या वर्षाला तर मुलीने नुकतीच पत्रकारिता कोर्सला ॲडमिशन घेतलेले. दोघांचेही विचार आईशी मिळते जुळते. रसिकाने मुलीचे नाव यशस्विनी तर मुलाचे नाव अजिंक्य ठेवले होते. रसिकाने अंगणात अबोलीचे झाड लावले होते फुलझाडांचे तिला खूप वेड होते. अबोलीला दररोज पाणी घालून पाच दहा मिनिट तरी तिथे थांबे. झाड छान बहरले होते. रसिकाला आपल्या घरातील व्यक्तींना काय हवं काय नको, हे सर्व पाहायला आवडत होतेच;

पण आता ती जिव्हाळा नावाचा वृद्धाश्रम काढणार होती. तिचा नवरा अनाथाश्रमात वाढला होता. काही वर्षापूर्वी तिची आई अपघातात मृत्यू पावली होती. जवळचं असं कोणी नव्हतं, तरी माहेरच्या लोकांचा खूप आधार होता. मुले मोठी झाल्यामुळे घरात वेळ जात नाही म्हणून तिने वेगवेगळया पद्धतीने स्वतःला गुंतवून घेतले होते. आतापर्यंत तिने अफाट

वाचन केले होते तिने पुस्तक भिशी हा प्रकार सुरू केला आणि तो सर्वांसाठी आदर्श ठरला. या निमित्ताने तिच्याबरोबर बऱ्याच जणांना पुस्तक वाचनाची आवड निर्माण झाली. तिच्या मैत्रिणी तिला ब्लॅक ब्युटी तर कोणी एव्हर ग्रीन म्हणत. दिसायला गहू वर्णी असणाऱ्या रसिकाच्या वेणीचा शेपटा कमरेच्या खालीपर्यंत होता. तिच्या पाणीदार डोळयात नेहमीच आनंदाची चमक दिसे. तिच्या हास्याने जणू मोती चमकल्यांचा भास होई. गालावरील खळया पाहून कोणीही मोहित होईल असे हास्य होते. तिच्या दिसण्या बरोबरच तिचा स्वभाव सर्वांना आपलेसे करून घेई. अलीकडे मात्र तिला स्वतःमध्येही काहीसा बदल जाणवू लागला. तिला थोडे फार काम केले तरी दमल्या सारखे वाटे. कोणाशीही बोलायला नको वाटे छोट्या छोट्या गोष्टींवरून चिडचिड होई. तिच्या मधला बदल यशस्विनी, अजिंक्य यांच्याबरोबर आशुतोषलाही मान्य होता. सहमतीने त्यांनी रसिकाला फॅमिली डॉक्टरांकडे दाखविण्याचे ठरविले. रसिकाला मात्र स्वतःला काही झाले आहे, हे मान्य नव्हते तिने चाल ढकल करून एक दोन महिने घालविले. मात्र एके दिवशी क्लासवरून परतताना, तिचा तोल जाऊन ती रस्त्यातच पडली. ओळखीच्या काकूंनी तिला घरी सोडले. आशुतोषने तिच्यापुढे आता हात जोडले आणि दवाखान्यात चलण्याचा आग्रह केला. त्याने त्यासाठी बँकेतून दीर्घ रजा काढली होती. दवाखान्यातील काही प्राथमिक टेस्ट वरून काही लक्षात येईना, म्हणून डॉक्टरांनी तिला बाकीच्या टेस्ट करायला लावल्या. आपल्याला काहीतरी वेगळे झाले तर मग आपल्या कुटुंबाचे कसे होणार, असे तिला वाटत होते. तरीही

आपण आपल्या योगामुळे मन आणि शरीराने कधीच हार मानायची नाही, हे तिने मनाशी पक्के ठरवले होते. बघता बघता तिचे वजन आठ ते दहा किलोने कमी झाले. म्हणतात ना चिता शरीराला जाते अन् चिंता मनाला जाळते. तिला आता दवाखान्याच्या ट्रीटमेंटसाठी वेळ द्यावा लागणार होता. तिने क्लासला जायचे बंद केले अन् त्यामुळे बऱ्याच जणांना तिच्या आजाराविषयी माहिती झाले. घरात असताना बघता बघता एके दिवशी ती बेशुद्ध पडली अन् तिला आयसीयूमध्ये दाखल केले. शकुंतला राहिला पाहायला गेली पण तिची स्थिती पहावेना. डोक्याचे ऑपरेशन म्हणून केस काढले होते. अन् डोक्याला सर्व पांढऱ्या पट्ट्यांनी गुंडाळले होते. अटॅकमुळे चेहरा बघवेना झाला होता. एकंदरीत तिची स्थिती पाहता शकुंतलाला अश्रू अनावर झाले. खरं तर सर्व स्थिती एकदम बदलली. अजिंक्य अन् यशस्विनी एकदम गंभीर झाले होते. भान हरपल्या सारखी त्यांची स्थिती झाली होती. कोवळया वेलीने वृक्षाचा आधार घेऊन मातीमध्ये आपली मुळं खोलवर रुजवून पक्कं उभ राहायच्या वयातच वेलीला सोसाट्याच्या वाऱ्याने उद्ध्वस्त करावं अन् वेलीचं अस्तित्व होत्याचं नव्हतं व्हावं, तसं काहीसं रसिकांचं अन् तिच्या कुटुंबाचं झालं होतं. अाशुतोषला मुलांना सावरणे क्रमप्राप्त होते; पण त्याला स्वतःलाच आधार नसल्याचा भास होऊ लागला होता. आता कोणी कोणास आधार द्यायचा अन् खोटा दिलासा द्यायचा ते कळेना. शकुंतलाला पाहाताच यशस्विनी अन् अजिंक्यने तिच्याजवळ आपलं मन मोकळं करून घेतलं. बघता बघता आशुतोषलाही स्वतःला सावरणे कठीण झाले. तो मनोमन ही सर्व स्थिती सुधारेल अशी प्रार्थना करत होता परंतु डॉक्टरांनी त्याला फक्त दोन तीन दिवसांत ऑपरेशनसाठी आर्थिक तरतुदीसाठी मुदत दिली. शेवटचा आशेचा किरण त्याला मृगजळासारखा दिसला होता.

ऑपरेशननंतर मात्र दोन महिन्यांनी तिला घरी नेण्याची परवानगी दिली. मुलांना खूप आनंद झाला; परंतु हा आनंद क्षणिक ठरेल, याची भिती आशुतोषला होती आणि ती खरी ठरणार हे डॉक्टरांच्या बोलण्यावरून पक्के होते.

तिच्या शारीरिक स्थितीत हळूहळू सुधारणाही झाली; पण विझण्याच्या आधी दिवा प्रज्वलित होतो त्याचप्रमाणे झालं. रसिका, आशुतोष, यशस्विनी, अजिंक्य यांनी जास्तीत जास्त वेळ एकत्र घालविला. रसिका सोडली तर बाकी सर्वांना आपापल्या कामानिमित्त बाहेर पडावे लागे, तरीही रसिका बरोबर कोणी एकजण राहील, याची पुरेपूर काळजी ते घेत. तिच्या बरोबर जो कोणी राही तो तिचे मन आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करी. विविध चित्रपट पाहणे, गाणी ऐकणे, वेगवेगळी नवनवीन झाडे लावणे हे छंद तिने जोपासले. अबोलीचे रोप लावलेली कुंडी तर तिने अंगणातून उचलून बेडरुमच्या खिडकीत ठेवायला लावली. अबोली बरोबर तिचे काहीतरी हितगुज चाले. तिच्या प्रकृतीत कधी कधी अचानक बदल होई. आशुतोषला येणारा प्रत्येक क्षण  पुढे काय मांडून ठेवेल याची धास्ती वाटे, अन् झालेही तसेच. काही दिवसांतच तिच्या जीवनाचा सूर्य अस्ताला गेला.

अन् मुलांच्याही जीवनात आईच्या ठिकाणी निर्वात पोकळी निर्माण झाली. आई या शब्दाने नयनी अश्रू दाटू लागले. घराचे घरपण हरविले. खिडकीत रसिकाने ठेवलेली अबोली मुकी होऊन शांतपणे उभी होती. तिच्यावर रोज मायेचा वर्षाव करणारे व पाणी घालणारे हात तिच्यापासून दूर गेले होते. तीही आता हळू हळू सुकू लागली. बहरलेली अबोली अबोल बनली होती.

# मालकीण

तालुक्याच्या गावाला मीटिंग होती म्हणून रमा पटापट आटपत होती. तिला या गावात सरपंच होऊनही चार वर्षे झाली होती. खरंतर तिला हे पद घेतानाही मनात खूप धाकधूक होत होती. आपण पडलो बाईमाणूस. कधी घरातही आपल्याशिवाय काही अडत नाही. घरात स्वयंपाक सोडून कुठलेच कार्यक्षेत्र नव्हतं. मग असं मोठं पद आपल्याला पेलवेल का परंतु शिवाजी रावांपुढे तीच काही चाललं नाही. महिला राखीव मग त्यांना स्वतःला पद मिळवण्यासाठी त्यांनी रमाला स्त्री स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून दिले. तू राजकारणात कशी योग्य तुझ्यासारख्या महिलांमुळे देशाची प्रगती कशी होऊ शकते, या आणि इतर अनेक गोष्टी सांगून तिला बळेच बोहल्यावर चढवले होते.

आताशा तीही धीट झाली होती. खूप काही अस्खलितपणे नाही पण शब्दांची जुळवाजुळव करून तरी पंधरा वीस मिनिटं बोलत असे. गावात प्रथमच महिला सरपंच व्हायचा तिला मान मिळाला. गावातील लोक शिवाजी रावांच्या समाजसेवेमुळे घरी ये-जा करत. तिला सर्वजण मालकीण तर शिवाजी रावांना मालक म्हणत. गेल्या काही वर्षांपूर्वी शिवाजी रावांनी सरपंच हे पद भूषवले होतेच. फरक एवढाच रमा सरपंच झाल्यामुळे स्त्रियांची वर्दळ वाढली. मालकीण बाईंकडे काम असले तरी निर्णय मालकच घेत. बघता बघता चार वर्षे सरली. सभा, मोठ्या ऑफिसमधल्या साहेबांच्या मीटिंग, गावासाठी विकास योजना यांची तिला चांगलीच माहिती झाली होती काही नाही तर मालकिणीकडे शेवटी का होईना

सहीला कागद येई. रमा नाही म्हटलं तर कला शाखेची पदवीधर होती. तिच्यात विविध कलागुण होते. तिला राज्यशास्त्र, अर्थशास्त्र हे विषय नावडीचे. मराठी, मानसशास्त्र हे विषय आवडत. लग्न झाल्यावर जरी शिक्षण चालू नसले तरी कथा, कविता, कादंबरी वर्तमानपत्र यांचं वाचन तिने सातत्याने चालू ठेवले होते लग्नाला सहा वर्षे झाली. तिला एक मुलगा एक मुलगी होती संसाराची वेल चांगलीच बहरली होती. तिला शिक्षणाला सासरहून परवानगी होती परंतु संसारचक्रात ती व्यवस्थित अडकली होती दोन वर्षांपूर्वी सासुबाई गेल्या अन् रमावर सनवार पाहुणे रावळे यांच्या जबाबदाऱ्या वाढल्या. तिला खऱ्या अर्थाने मालकीन व्हावे लागले. शिवाजी रावांच्या घरी वाडवडिलांपासून बागायती शेतीची परंपरा. लक्ष्मी घरी नांदत होती आणि घरंदाज घराण्याच्या प्रतिष्ठेमुळे रमाला नवीन असताना दबल्या सारखे होई पण पुन्हा ती या सर्व वातावरणात रूळली. एक दीड गुंठय़ाच्या वाड्याची व्यवस्था तिच्या एकटीच्याने होत नसे म्हणूनच तिने हाताशी सखूला घेतलं होतं सखू म्हणजे तिची सावली जणू. घरातल्या हर एक कामात ती मदत करे बरीच कामे ती स्वतःहून पुढाकाराने करी. वाड्याच्या स्वच्छतेपासून ते सणाच्या स्वयंपाकात सर्व तीच करे. रमाताई सरपंच झाल्यापासून त्यांच्या मनाची चाललेली होरपळ तिच्या लक्षात येत होती. रमाबाईंना कोणताही निर्णय घ्यायची मुभा नाही, सारे निर्णय मालकांचेच रमा मालकीन होती म्हणून थोड्या फार अधिकारांची तिला अपेक्षा होती. ' ओ रमाताई' या वाक्यासरशी ती विचार चक्रातून बाहेर आली. सखू आणि त्या दोघीही गाडीत बसल्या तालुक्याच्या गावाला मीटिंग असली की मालक असले तरी सखूही सोबत राहात असे. मीटिंग नंतरही पंचायत समिती व इतर ठिकाणची कामे होऊन मालक येईपर्यंत या दोघी विठुरायाचे, गजानन महाराजांचे, चंद्रभागेचे दर्शन घेऊन येत. मीटिंगला जायचे म्हणजे लक्षात घ्यावयाच्या सर्व बाबी रमाला समजल्या पाहिजे ; पण सही महत्त्वाची बाकी निर्णय मालकांचा घरात रामू अन् सासरे मुलांना बघायला

असतच. सखू रामू अन् दोन मुली असा संसार सुरळीत चालला होता. सखूची एक मुलगी नेहमी मालकांच्या मुलींबरोबर खेळायला म्हणून येत असे. शिवाजी रावांनी गाडीचा हॉर्न वाजवला त्यासरशी रमा, सखू दोघेही गाडीतून उतरल्या. दोन तीन तासात मीटिंग देवदर्शन आणि इतर कामे उरकून पुन्हा सर्वजन परत निघाले. रमा अन् मालक पुढे तर सखू मागच्या सीटवर. रमा अन् मालक पुढे तर सखू मागच्या सीटवर. रमा अन् शिवाजीरावांचा जोडा लक्ष्मी - नारायणासारखा वाटे. रमाच्या देखणेपणावर सासरचे सर्वजण खुश होते. ती तितकीच हुशारही होती. परंतु तिच्या हुशारीमुळे जास्त काही फरक त्यांच्या कुणात पडणार नव्हता. तिच्या सासूबाईंना तिचे संस्कार, वागणं खूप आवडे. तिघी बहिणींमध्ये रमा मधली. स्वभावाने शांत. समाधानी वृत्तीमुळेच ती संसारात समाधानी होती. माहेरी भाऊ नसला तरी तिघी बहिणींचा आई वडिलांनी मुले समजून वाढवले होते. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा या संकल्पनेपेक्षा मुलगी दोन्ही कुळांचा उद्धार करून ज्ञानाच्या प्रकाशाने घर उजळते यावर त्यांचा विश्वास होता. माहेरी सर्व व्यवस्थित होते. थोरली बहिण मुंबईला होती. तर धाकटी बहिण डॉक्टर झाली होती. ती तिच्या डॉक्टर नवऱ्याबरोबर परदेशी स्थिरावली होती. रमाचाच आधार सासरी अन् माहेरीही वाटे. आपल्या आई बाबांच शेवटी कसं होणार म्हणून तिला काळजी वाटे. रमाच्या सासरी जाऊन चार दिवसही रहाणे म्हणजे तिच्या आई बाबांना नको वाटे. सासरच्या जबाबदाऱ्या असताना अधूनमधून माहेरी जाणे तिला अवघड जात होते. अवघ्या चाळीस किलोमीटरवर असणाऱ्या माहेरी वर्षा सहा महिन्यांनी जायला वेळ मिळे. तरीही वरचेवर त्यांना काय हवं काय नको याची ती चौकशी कोणाकडून का होईना करत असे. शिवजीरावांसारखेच सासरच्या कुणालाच या गोष्टीचा त्रास वाटत नव्हता.

तिला मघाशी झालेल्या मिटिंगची आठवण झाली. मीटिंगला जाण्यापूर्वीच मिटींगमध्ये तू काही बोलू नकोस म्हणून शिवाजीरावांनी सांगितले होते. यावर रमा नाराज झाली होती. मिटींगमध्ये बऱ्याच महिला सरपंच बोलतात

; पण आपल्यालाच मुभा नाही. रमाला आपणही आपला एखादा विचार मांडावा असे वाटे. कारण पन्नास टक्के आरक्षणामुळे राजकारणात बऱ्याच स्त्रिया दिसू लागल्या होत्या. पन्नास टक्के स्त्रिया जरी बोलत नसल्या तरी आपली मतं मांडीत. बाकी नुसत्या सहीच्या मालकिणी. मागे एकदा मिटिंगला बोलावण्यात आले. परंतू घरात शिवाजीराव नव्हते. काही कामानिमीत्त ते मुंबईला गेले होते. घरामधल्या दोन्ही गाड्या जागेवर नव्हत्या. गावातली वाहनेही भाड्यासाठी बाहेरगावी गेलेली. तिने गावात सांगितले असते तर कुणीही एक वाहन उपलब्ध करून दिले असते. परंतु दुसऱ्यांना त्रास द्यायला तिला आवडत नसे. कुणाच्या गाडीवर ती केव्हाच बसली नव्हती. ते तिच्या तत्वात बसत नव्हतेच. गावामध्ये वातावरण बरोबर नाही, नको त्या विषयांची चर्चा या सर्वांचा तिला चांगलाच अभ्यास होता. आपण बसनेच तालुक्याच्या गावाला जायचे हे ठरवून तिने सखूला बरोबर घेतले. बस वेळेवर येईना. आपण या सुरळीत बससेवेची मागणी आजच्या मिटिंगमध्ये करायची असे तिने ठरविले. उशिरा का होईना बस मिळाली. मिटींगच्या आधीच दोन तास निघाल्यामुळे मिटिंग सापडली. मागे एकदा नुकतेच सरपंच होऊन चार-पाच महिने झाले होते. अन् शिवाजीराव नसताना ती तिच्या चुलत दिरांच्या गाडीवर बसून गेली. गावात थोड्या दिवसात चर्चेला उत आला. गावावरून आल्यावर शिवाजीरावांना कळले. त्यांनी रमाला बजावून सांगितले, 'आपण खेडेगावात रहातो, अमेरिकेत नाही. जमत नसेल तर जायचंच नाही मिटिंगला. ' सर्व प्रकरण तिला डोक्याला तापदायक ठरले. तेव्हापासून शिवाजीराव किंवा सखू यांना बरोबर घेतल्यावरच ती परगावी मिटिंगला जाई. नाही म्हटलं तरी खेडेगावात थोडी लोकसंख्या, लोकवस्ती कमी, त्यामुळे कोण कुठं, कशासाठी कोणाबरोबर जातं याची बातमी पारावर बसून बरेचजण घेत असतात. खेडेगावातील लोक शिकली तरी त्यांच्या विचारात प्रगल्भता नव्हती. अजूनही खेडेगावात स्त्रियांना पाहिजे तशी मोकळीक मिळत नाही. त्या स्वत: निर्णय घेऊ शकतात; पण तशी परवानगी त्यांना

नाही. रमा मात्र सर्व रूढी, परंपरा, अंधश्रध्दा यावर मात करणार होती. आपल्या मुलाला मुक्त आकाश मिळणारच; पण आपल्या मुलीलाही खूप शिकवणार होती.

आजच्या मिटिंगमध्ये बऱ्याचजणांना आजकाल होऊ लागलेल्या त्रासाची चर्चा झाली होती. रमालाही हे पटत नव्हते, माहितीच्या अधिकाराचा योग्य वापर होत नव्हता. कुणीही उठसूठ माहिती मागत होता. दररोजच्या कामात या एका कामाची भर पडे. काही वेळेस या अधिकाराचा योग्य प्रकारे योग्य माहितीसाठी वापर होत असला तरी बऱ्याचवेळा विरोधी गटातील लोकांकडून एखाद्या ' क्ष' व्यक्तिला तयार करून त्याच्याकरवी माहिती मागवली जात होती. माहिती देण्याविषयी कोणाची ना नसे; परंतु अशा एक ना दोन. वेगवेगळया स्तरातून वेगवेगळया पध्दतीची, प्रकारांची माहिती मागणाऱ्या चार-पाच व्यक्ती असत. त्यांना माहिती पुरवण्यासाठी ती गोळा करण्यातच बराच वेळ जाई. गेल्या महिन्यात विरोधी गटाने शिवाजी रावांना असाच वैताग दिला होता. हाच मुद्दा त्यांनी मिटिंगमध्ये रमा करवी मांडला; पण त्यात अधिकाऱ्यांनी उलट त्यांनाच सांगितले. कारण रस्त्यावरचा भिकारीदेखील तुम्हाला माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवू शकतो आणि तुम्हाला ती पुरवावीच लागते. या सर्व चर्चेवरून विरोधी गट आपल्या कामात नेहमीच लुडबूड करणार याच विषयावर रमाबरोबर चर्चा करत होते. चर्चा करताना ते बरेच त्वेषात होते. रस्त्याने अंधारही दाटला होता. त्यातून रस्ता बरोबर नव्हता. शिवाजीरावांच्या गाडीचा वेग बराच होता. सखू तर सीटचा आधार घेऊन जाम बसण्याचा प्रयत्न करत होती. बघता बघता अचानक मोठ्या दगडावरून गाडी उडून रस्त्याच्या कडेच्या खड्डयात घसरली. रमा, सखूला थोडे खरचटले ; पण गाडी शिवाजीरावांच्या बाजूने रस्त्याच्या खाली गेल्याने त्यांचे पाय गाडीखाली अडकले. जवळच असणाऱ्या वस्तीवरच्या लोकांनी आवाजामुळे, लाईटच्या प्रकाशामुळे घटनास्थळी धाव घेतली. सर्वांना मदत करून दवाखान्यात वेळेवर पोहोचवले. परंतु शिवाजीरावांचे पाय अधू झाले. मदत

मिळाली; पण पुढील सारं पाहून रमाच्या अंगावर काटे उभे राहिले. तिला आपणच अधू झालो आहोत असे वाटू लागले.

शिवाजीराव मनाने खचले, आपण अधू झालो. ते नशिबावर नाराज झाले; परंतु दैवनिर्णयापुढे कुणाचेच काही चालत नाही. मग तो राव असो की रंक. हळू-हळू त्यांना व्हिलचेअरची सवय झाली. वाड्यात ते फिरत ; पण वाड्याबाहेर ते जास्त नव्हे क्वचितच बाहेर पडत. लवकरच त्यांना जयपूर फूट बसविण्याचा निर्णय घेतला. या सर्व गोंधळात रमाला आता स्वत: चा सारा कारभार पाहण्याची वेळ आली. स्वत: चे निर्णय ती स्वत: घेऊ लागली. गावात सभा घेणे. नवीन योजना जाहीर करणे, अंमलबजावणी करणे, बघता बघता तिने स्वत: बरोबर गावाचाही कायापालट केला. कोणत्याही योजनेतून हातचं राखून काम करण्याची. काहीतरी आपल्याला मिळेल अशी अपेक्षा ठेवायची हा तिचा स्वभावच नव्हता. शिवाजीरावांना हे पटत नसलं तरी दुसऱ्याचा पैसा पचनी पडत नसतो. कलियुगात इथल्या इथे परतफेड करावी लागते, याची जाणीव तिने करून दिल्यावर झालेल्या घटनेचा विचार करून ते शांत राहू लागले. त्याचं आता काही चालणारही नव्हतंच.

रमाच्या कामामुळे ती थोड्याच दिवसात लोकप्रिय झाली. वाड्यावरची वर्दळ वाढली. मालकिणबाईंचा बराच वेळ लोकांसाठी खर्ची पडू लागला. गावातल्या बायकांना विविध योजनांमुळे लाभ मिळू लागला. रमाला आता सारे व्यवहार कळू लागले. बऱ्याच गोष्टी ती नव्याने शिकली. शिवाजीरावांना हे सर्व प्रथम अवघड वाटत होते; पण हे सर्व योग्यच आहे हे हळू-हळू पटू लागले. रमाला तिच्या कार्यामुळे गावात लोकप्रियता मिळालीच, तिला ‘ आदर्श सरपंच’ पुरस्कार मिळाला. या कार्यक्रमासाठी सासरच्या सर्वांबरोबरच माहेरच्या सर्वांना आमंत्रण दिले. रमाच्या आई-वडीलांना खूप आनंद झाला. आपल्या लेकीच्या यशामुळे तिने आकाशाला गवसणी घातली, हे जाणवलं. त्यांनी तिला काही भेट देऊ केल्यावर यापुढं तुम्ही माझ्याबरोबर रहायचं हे मान्य केल्याशिवाय मी तुमची कोणतीच भेट

स्विकारणार नाही, हे तिने जाहीर केलं. शेवटी मुलीपुढे आई- वडिल हतबल झाले. मुंबईहून बहीण, भावोजी आले होते. त्यांनाही खूप आनंद झाला. सासरेही प्रभावित झाले होते. घरात, वाड्यातच नव्हे तर गावात गावजेवण देऊन आनंदोत्सव झाला. पुढेही याच सरपंचांना संधी देण्याविषयी एकमत झाले. तिच्या निर्णयक्षमतेमुळे तिच्याच काय पण गावाच्या, गावातल्या स्त्रियांच्या जीवनात प्रगतीची पहाट झाली. मालकिण खऱ्या अर्थाने मालकिण झाली.

# सल

आज सकाळपासून टिटवी घरावरून घिरट्या घालीत होती. आकाशही ढगाळलं होतं. त्यामुळे वातावरणात उदासी पसरली होती. शेवंताबाईंचा सकाळपासून उजवा डोळा फडकत होता. आज काय होणार अन् काय नाही. एक तर वातावरण असलं, कामातही मन लागंना. शेवंता बाईंना सहा मुलीचं. मुलगा होईल या आशेवर सहा मुली झाल्या. मुली मात्र देवाने नक्षत्रासारख्या दिल्या होत्या. असं म्हणतात की, ‘गरिबांच्या घरात सौंदर्य देवाने भरभरून दिलेलं असतं’ आधी त्याला पोटा पाण्याचा घोर, अन् ते काय कमी म्हणून सौंदर्याची भर. सांभाळायचं जपायचं म्हणजे आणखी जास्तीची काळजी. शेवंता बाईंच्या सहा मुलींपैकी तिघींची लग्न झालेली होती. शेवंताबाईंकडे नाही म्हटलं तरी बागाईत शेती सहा एकर होती; पण गेल्या दोन महिन्यांपूर्वी अपघातात नवरा गेला, अन् शेवंता बाईंना आभाळ कोसळल्यासारखे वाटू लागलं. तरीही लग्न झालेल्या तिन्ही लेकी अन् तीनही जावई, सासूबाईंना आधार देण्यासाठी सरसावले. तसं तर असं म्हणतात की, मुलींना आई- वडिलांची जास्तच काळजी वाटत असते. या तत्त्वाने की काय मुली, जावई विचारपूस करत. जास्त काय हवं नको, ते सर्व वरचेवर विचारत होते. शेवंताबाईंचा खूप मोठा आधार गेला. जीवनसाथी शिवाय जीवन जगणं खूप अवघड होतं; पण दोघांनी पाहिलेलं त्यांच्या संसाराचं चित्र पूर्ण तर करायला हवं. मांडलेला खेळ अर्ध्यावर सोडून घरधनी गेला तरी, तो खेळ आपण तरी पूर्ण करायलाच हवा. याची त्यांना चांगली जाणीव होती. बघता, बघता दिवस जात होते. शेवंताबाई जाधव तशा काही कमी खमक्या स्वभावाच्या नव्हत्या.

गावात कुणी नजर उचलून पोरींकडे बघेल तर मग, त्याला भर चौकात बडवल्याशिवाय शेवंताबाई गप्प बसत नव्हत्या. त्यामुळेच त्यांच्या सहा अप्सरे सारख्या पोरींकडे कुणी नजर उचलून काय; पण नजर वळूनही बघत नव्हतं. जाधव काका जाऊन सात महिने झाले अन् वर्षाच्या आत लग्न कार्य करायचं म्हणून जाधवांच्या घरात लेकी जावई अन् सासूबाईंची मीटिंग झाली. सर्वानुमते चार अन् पाच नंबरच्या मुलींच्या लग्नाचा बार उडवून द्यायचा असे ठरले. त्यामुळे आपोआपच शेवंताबाईंची जबाबदारी कमी होईल. तसं तर लग्न म्हटलं की तयारी आलीच. ती काय साधी- सुधी नाही. लग्न दहा पंधरा मिनिटांत उरकेल; पण त्याची तयारीच खूप दिवसांपासून करावी लागते. लग्नानंतर एक वर्षभर सण- वार, माहेरपण, आहेर, मानपान अन् राहिलं साहिलं म्हणून बाळांतपण. एक वर्षभर तर हात खर्चातून बाहेर पडत नाही. रिमा, मीना, जया यांची लग्न होऊन प्रत्येकीला दैवकृपेने एक मुलगा, एक मुलगी होती. छाया, माया, प्रतीक्षा लग्नाच्या होत्या. त्यांच्या लग्नाच्या तयारीचे नियोजन अन् कार्यवाही रिमा, मीना अन् जया यांच्याकडे होती. रीमा पोस्टात, मीना सरकारी बँकेत, तर जया खासगी बँकेत नोकरीला होती. छाया, माया, प्रतीक्षा तिघीही खूप हुशार; पण मुलींना शिकवून डॉक्टर, इंजिनिअर करणं, शेवंता बाईंच्या तत्त्वातही नव्हतं अन् आर्थिक नियोजनातही बसत नव्हतं. त्यामुळे शेवंताबाईंनी पोरींना बारावीपर्यंत शिकवून शिक्षण थांबवलं होतं. एक तर नवऱ्याची सोबत नाही अन् वर खर्चाचा धोंडा गळयात बांधलेला होताच. दगड दोराने गळयात बांधून नदीत बुडणं सोपं; पण सुंदर पोरी घेऊन जगणं खूप अवघड. पोरी मात्र खूप सालस अन् व्यावहारिक.

त्यामुळेच मुलींना स्थळांची काही कमी नव्हती. आजपर्यंत शेवंतबाईंनी जावयांना मुलगी आणि नारळ या बोलीवरच पोरी दिल्या होत्या. मागाहून सणवार, मानपान, सोनं-नाणं, अधिक वाण असलं मात्र हौसेनं भरभरून करत होत्या. खरं तर या महागाईच्या जगात एवढ्या जणांचं घर चालवणं सोपं नव्हतं; पण शेवंता बाईंनी मात्र हिम्मतराव त्यांना अपघातात सोडून गेल्यापासून, येणाऱ्या प्रत्येक संकटाला हिमतीने तोंड दिले होते. बघता बघता छाया, मायाच्या लग्नाचा दिवस येऊन ठेपला. सर्व बाजूने तयारी झाली होती. एखाद्या कार्याला सगळयांचेच हात लागले, की ते कार्य झटपट होते. या कार्यामध्ये तर खूप हात मदतीसाठी सरसावले होते. शेवंताबाई अन् हिम्मतरावांची पुण्याई. पोरींना चांगली घरं मिळाली होती. थोरला जावई पोलिस, दुसरा वकील, तिसरा इंजिनिअर होता. आता चौथा जावई व्यापारी तर पाचवा डॉक्टर. पोरीचं रूप अन् गुण यांची कदर करणारी स्थळ होती सगळी. पहिल्या तिघी आपल्या संसारात सुखी होत्या. आज शुभकार्य असल्याने आपला मान मोठेपणा सगळं बाजूला ठेवून सारेजण एकत्र आले होते. लग्नघटिका जवळ येऊ लागली, तशी शेवंताबाईंना एक प्रकारचा ताण मनावर जाणवू लागला. आज हिम्मतराव असते तर, या विचारांनी त्यांचे मन आणि नयन भरून आले. मुलींना आईच्या डोळयात पाणी पाहून वाईट वाटू लागले, परंतु शुभ प्रसंगी साऱ्यांनीच मनाला आवर घातला. बघता, बघता लग्नघटिका आली. अन् सनईच्या मधुर वादनात सप्त सुरांसह देवा-ब्राह्मणांच्या साक्षीने वधू वरांनी एकमेकांना वरले. खरंतर या वेळेस सर्वजन खूप आनंदीत होते. सर्व विधी पार पडले आणि थोड्या वेळाने नवरा नवरीला जेवणासाठी ताट आणली होती. ताटा मधले सुग्रास जेवण

मनास तृप्त करणारे होते. पुरी-श्रीखंड, बटाट्याची भाजी, पुलाव, चटणी, कोशिंबीर छोल्याची पातळ भाजी. साऱ्यांनाच आता भूक लागली होती. मायाच्या नवऱ्याने तर खूप प्रेमाने आपल्या अर्धांगिनीला प्रेमाने घास भरवला. अन् हौसेने खाल्लाही; पण छायाचा नवरा काही केल्या पुरीचा घास तोडायला तयार होईना. सर्वजन त्यांना घास भरवण्याची विनंती करत होते; पण ते काही ऐकायला तयार नव्हते. शेवटी बोलून चालून यशस्वी व्यापारीच तो. छायाला मग सर्वांनी तूच घास भरव म्हणून आग्रह केला. छाया खूप लाजत होती. तशी ती सगळ्या बहिणीत लाजाळू अन् कमी बोलणारी. त्यामुळे तिला साऱ्या बहिणींनी तयार केलं. अन् घास भरवायला लावला; पण छे! जावई घास घ्यायलाही तयार होईनात. शेवटी छायाच्या नणंदेला भावाला समजावण्याची विनंती केली. थोड्या वेळाने छायाची ननंद सांगायला आली.

'दादाला, अर्धा तोळ्याची अंगठी हवी. नाही तर दादा जेवणार नाही. ' या निरोपाने साऱ्यांच्या चेहऱयावरचे रंग उडाले. अंगठी घालणे अवघड नव्हते; पण एक अंगठी नाही तर पाच अंगठ्या घालाव्या लागणार होत्या. कारण आजपर्यंत कोणत्याच जावयाला अंगठी घातली नव्हती. मग का म्हणून अंगठी घालायची? साऱ्यांनाच काय करावे सुचेना. शेवटी जयाकडून नणंदेला, पहिल्यांदा घरी जावई आले की अंगठी घालू म्हणून निरोप दिला. नाही, होय म्हणता कसे तरी जावईबापू तयार झाले. तेव्हा कुठं जावई बापूंनी घास घेतला. शेवंता बाईंना त्याचवेळेस जावयाची खोड लक्षात आली; पण दगडाखाली हात असल्यावर माघार घ्यावीच लागते.

दिवसामागून दिवस जात होते. मायाला मुलगा होऊन एक वर्ष झालं. छाया मात्र निवांत होती. या विषयी काही बोलले कि ती चिडतच असे. तसे लग्नापासून जावयाने सासरी बरेच रंग दाखवले होते. आल्या संकटाला सामोरे जाणं कर्तव्यच आहे, असं समजून शेवंताबाई चालल्या होत्या; पण एवढा मोठा व्यापारी जावई. त्याला सासरच्या गोष्टींचीच का अपेक्षा होती? ते मात्र कळत नव्हते. आज-काल तर आपल्या बरोबरीने लग्न झालेल्या मेहुणीला अपत्य आहे; पण आपल्याला नाही ही सल त्यांच्या मनात बोचत होती. त्याच्या सख्ख्या भावाचे आठ महिन्यांपूर्वीच लग्न झाले होते. मुलगी साधारणच होती; पण घरची परिस्थिती जोरदार होती. तिच्या घरच्यांनी भरभक्कम हुंडा अन् हौस मौज करून लग्न करून दिले. तेव्हापासून मनात सलणार दुःख आणखीनच वाढलं होतं. नाना तऱ्हेने तो छायाला त्रास देत होता; पण छाया बिचारी, आपल्या आईला त्रास नको. म्हणून गप्प बसून सहन करी. काही दिवसांपूर्वीच बहिणींकडे चार दिवस जाऊन यावे. म्हणून जयाकडे अन् मीनाकडे चार चार दिवस राहायला ती गेली होती. तिचे लग्न होऊन एक वर्ष होऊन गेले; पण अजूनही मुलबाळ नाही. म्हणून तिचा नवरा तिला खूप त्रास देई. बहिणीकडे चार चार दिवस राहिल्यावर तिच्या मनाला आणि शरीराला थोडा आराम वाटला; पण शेवटी काही जरी झालं तरी शेवटी तिला आपल्या कर्म भूमीकडे परतावाच लागणार होतं. चार तिथे चाराचे आठ दिवस झाले तर काही खैर नाही म्हणून सांगितलेल्या दिवशी ती परतली. नवऱ्याचा मूड काही वेगळा वाटला: पण खूप दिवसांच्या विरहामुळे प्रेमाची लाट येणारच, असं मानून छाया घरातल्या कामाला लागली; पण काही दिवसांनी जेव्हा आपला कार्यभाग

साधून झाला. तेव्हा मात्र तो मूळ पदावर आला. ‘मला व्यापारासाठी म्हणून ट्रक घ्यायचा आहे. माहेरून तेवढे पैसे घेवून ये. ‘

त्यांच्या या वाक्यावर छायाला खूप चीड आली; पण बोलून भांडून काहीच उपयोग नव्हता. तिने त्यांना खूप गोड गोड बोलून समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; पण त्याला ते मान्य नव्हते. स्वतः तो तिला माहेरला सोडायला गेला. सासूबाई पुढे काहीच बोलल्या नाही.

‘ आत्ती चार दिवसांनी न्यायाला येतो. तेवढीच चार दिवस तिला विश्रांती मिळेल. ‘

या त्यांच्या वाक्यावर सासूबाईंनाही थोडा संशय आलाच; पण नक्की काय झाले. हे जाणून घेणं महत्त्वाचं होतं. म्हणून त्यांनी होकारार्थी मान हलवली. एवढ्यात छायाला मळमळायला लागलं. म्हणून ती पळतच न्हाणीत पळाली. तसं तर तिला सकाळपासून त्रास होऊ लागला होता; पण नवऱ्याला सांगितलं. तर तो नुसती चिडचिड करणार. त्यापेक्षा आईकडे गेल्यावर आईलाच सांगावं. म्हणून ती गप्प होती; परंतु तिला आता उलटी आल्यासारखे वाटू लागले आणि चक्करही येऊ लागली.

‘अगं काय झालं चल जरा विश्रांती घे?’

आईच्या या वाक्यावर छाया झोपायला जाणार, तेवढ्यात आपल्या नवऱ्याचा विचार तिच्या डोक्यात आला.

‘ त्यांना जेवायला वाढते अन् मग विश्रांती घेते. ‘

हे वाक्य ऐकल्यावर शेवंताबाईंना खूप वाईट वाटले. खरंच आपली मुलगी जावयाला किती घाबरते. तरीपण त्या स्वतःला सावरत तिला म्हणाल्या,

‘ तू जा विश्रांती घ्यायला, मी वाढते जेवायला. ‘

शेवंता बाईंनी अनुभवावरून ओळखलं होतं. छायाला नक्की काय झालं. जेवताना त्यांनी जावयाला छायाला दवाखान्यात नेण्याविषयी सुचविले, तर जावयाने लगेच जबाबदारी झटकली.

‘तुम्हीच घेऊन जा. मला जरा घाई आहे. मी लगेच निघणार आहे. ‘

झालं जावई बापू आले अन् गेले. शेवटी काय, शेवंताबाई छायाला घेऊन दवाखान्यात गेल्या. डॉक्टरांनी छायाला तपासले. अन् लगेच शेवंताबाईंचे अभिनंदन केले.

‘अभिनंदन’ तुम्ही आजी होणार. ‘

या वाक्यासरशी शेवंताबाई छाया दोघेही खूश झाल्या. गोळ्या औषध आणि डॉक्टरांनी सांगितलेल्या गोष्टी छायाने लक्षात घेतल्या. छायाने घरी आल्या आल्या नवऱ्याला फोन केला. तिला वाटलं त्यांचा आनंद गगनात मावणार नाही. तसा त्यांनी आनंद व्यक्त केला; पण लगेच स्वतःला सावरत पैशांची मागणी लक्षात आणून दिली. तिला कुणीतरी दुधात मिठाचा खडा टाकल्यासारखं वाटलं. तिने फोन ठेवला अन् मग बहिणींना फोन करून सांगावं असं तिला वाटेचना. प्रतीक्षाने मग साऱ्यांना फोन करून कळवले. शेवंताबाईना मुलीचे लक्ष विचलित झाल्याचं

जाणवलं. किती आनंद व्हायला पाहिजे. मग, मग या विचाराने त्या सुन्न झाल्या. त्यांनी मग तिला विश्वासात घेऊन विचारले; पण छायाने आईला अंत लागू दिला नाही.

‘काही नाही, माझा हा आई होण्याचा पहिलाच अनुभव असल्यामुळे असेल, तू नको काळजी करू. ‘

छाया असं म्हणाली खरं; पण ती मनातल्या मनात विचारांच्या खोल गर्तेत पडली होती. दोन चार दिवसांनी ती आपल्या घरी परतली; पण तिला आता आपल्या नवऱ्या पुढे काय सांगायचे हा प्रश्न सतावत होता. बघता बघता रात्र झाली. तिला आता उत्तर द्यावेच लागणार होते. आली वेळ मारून नेण्यासाठी, आईला पैशाच्या मागणीबद्दल सांगितल्याचं, नवऱ्याला तिने सांगितलं. आई थोड्या दिवसांनी बघू म्हणाली असंही सांगितलं. जावई बापूंना दोन्ही बाजूंनी लॉटरी लागल्यासारखे वाटले.

दिवसामागून दिवस जात होते. पाचव्या महिन्यातली सोनोग्राफी केली अन् डॉक्टरांनी बाळं सुखरूप असल्याचं सांगितलं. बाळं म्हणल्यामुळे दोघही चक्रावली. डॉक्टरांनी दोघांच्या चेहऱ्यावरचे भाव ओळखले, अन् लगेच विश्लेषण केले.

‘जुळयांचा जन्म होणार आहे. ‘

हे ऐकून छायाला एकीकडे आनंद झाला; पण दुसरीकडे मनावर ताण जाणवू लागला. तिच्या नवऱ्याला मात्र खूप आनंद झाला. त्याने घरी आल्यावर

घरात खूप आनंदाने ही बातमी सांगितली. पहिलं बाळंतपण माहेरी म्हणून छायाने नवऱ्याला विचारून, माहेरी दवाखान्यात नाव नोंदवण्याविषयी विचारले. यावर 'तुझं बाळंतपण इथेच शहरात होईल. वाटल्यास दवाखान्याचा खर्च द्या म्हणावं. अन् इथे येऊन रहा म्हणून सांग. '

या निर्णयावर छाया गप्प बसली. तिने दुपारी निवांत आईला दवाखान्याचा रिपोर्ट आणि नवऱ्याचा निर्णय सांगण्यासाठी फोन केला. आईला छायाला जुळे होणार म्हणून आनंद वाटला; पण जावयाच्या घरापेक्षा आपल्या घरीच लेक आली असती, तर झालं असतं चांगलं, असं वाटलं. पण हायकोर्टाच्या निर्णयावर त्या काहीच बोलू शकणार नव्हत्या. बघता बघता चोर चोळी झाली. सातव्या महिन्यातील चोळीही झाली. चोळी झाल्यावर, लेकीसाठी म्हणून शेवंताबाई छायाच्या घरी जाऊ शकत नव्हत्या. घरात प्रतीक्षा होतीच. तरुण पोरीला एकटे सोडणे योग्य नव्हते. घेऊन जाणेही योग्य नव्हते, कारण तिचं कॉलेज संपल्यावर मी येईन असं त्यांनी सांगितलं. छाया स्वतःची काळजी घेत होती अधूनमधून जावई बापू ट्रकच्या पैशांची आठवण करून देत. तसं पहाता तर त्यांना स्वतःला काही कमी नव्हतं; पण आपल्याला मेहुणा नाही. बागायती शेतीचे भरपूर उत्पन्न. मग आपल्याला थोडा तरी फायदा नको का? हा विचार फक्त याच जावयाच्या मनात येत होता.

छाया मात्र एका डोळयात उद्याची स्वप्नं, तर एका डोळयात भयानक भविष्य घेऊन जगत होती. ती प्रत्येक दिवस काळजीत ढकलत होती. खरं तर या

दिवसांत खूप आनंदी राहायला हवं. हे छायालाही माहीत होतं; पण शेवटी स्वप्न आणि वास्तव यात खूप फरक असतो. डॉक्टरांनी दिलेली तारीख जवळ आली अन् सासूबाई आल्या. छायाच्या नवऱ्याला सासूबाईंनी थोडी तरी रक्कम आणली असेल, असं वाटलं; पण त्यांची निराशा झाली. तरीही ते छाया जवळ गप्प न बसता कुरकुरलेच; पण तिने बाळंतपणाचा खर्च आहे. पुन्हा बघू म्हणून समजूत काढली. एक एक दिवस जवळ येत होता. तसा छायाला ताण जाणवू लागला. शेवटी गुरुवारचा दिवस उजाडला. आज सकाळपासूनच छायाला त्रास होऊ लागला. म्हणून शेवंताबाई तिला घेऊन दवाखान्यात गेल्या. अवघ्या दोन- अडीच तासात तिचे सिझर करावे लागले. दोन गोंडस बाळांना तिने जन्म दिला. एक मुलगा एक मुलगी. शेवंता बाईंनी छायाच्या डोक्यावरून कपाळावरून हात फिरवून, तिच्या तब्येतीची चौकशी केली. जावईबापूंचा आनंद गगनात मावत नव्हता. त्याने छायाला एका शब्दानेही विचारले नाही; पण आपल्या बाळांशी गप्पा मारण्यात ते गर्क झाले होते. तिला आपल्याशी बोलले नाही, या दुःखापेक्षा बाळांना आनंदाने घेतलं. याचं खूप समाधान होते. शेवटी या मोठ्या आनंदाने तरी माणसाचा स्वभाव बदलेल, असं तिला वाटत होतं. जावयांनी आनंदाने साऱ्या भावकीत, नातेवाईकात पेढे अन् जिलेबी दोन्हीही वाटले. त्यांना आता स्वर्ग दोन बोट उरल्याचा भास होत होता.

बघता बघता अमृता अन् अमोल यांचा वाढदिवस तोंडावर आला. जावईबापूंनी तो खूप धामधुमीत करायचं ठरवलं. त्यांनी पैशांची केलेली मागणी सासरच्यांनी पूर्ण केली नव्हती. म्हणून त्यांनी जोपर्यंत सासरहून पैसे येत नाही.

तोपर्यंत बायकोला माहेरी पाठवायचे नाही असे ठरवले होते. बाळांतपणानंतर फक्त एक महिना तिला माहेरी पाठवले; पण पुन्हा मात्र कधी पाठवलेच नाही. तीही आपले मन मारून नाईलाजाने राहात होती. आता मात्र वाढदिवसाला सगळयांना बोलावलं; पण सासरी आमंत्रण दिलं नव्हतं. छायाला खूप वाईट वाटू लागलं. सासूबाईंना तर ट्रकच्या पैशांची मागणी माहिती नव्हती. त्यामुळे 'आम्हाला वाढदिवसाचे निमंत्रण का नाही?'

म्हणून त्यांनी छायाला फोनवरून विचारणा केली. छायाने आज आपल्या मनातले दुःख, आईला सांगून मन मोकळे केले. मनावरचा एक दगड बाजूला सारला. तरी तिला हा दगड आईच्या मनावर ठेवला. याचे वाईट वाटत होते. आईने सर्व परिस्थिती लक्षात घेतली अन् बाकी सर्व आले की त्यांच्या बरोबर सल्ला मसलत करून एकटे का होईना, वाढदिवसाला जायचे ठरवले. वाढदिवसादिवशी दारात मंडप अन् बाकीचा सर्व थाट जावई बापूंनी केला होता. जेवणासाठी पंचपक्वानांचा बेत होता. बघता बघता सर्व पाहुणे मंडळी, भावकी गोळा झाली. सासूबाईही आल्याच होत्या. याच संधीचा फायदा घेऊन जावयाने सासूबाईंनी आणलेल्या भेट वस्तूंवरून त्यांचा अपमान केला. छायाला तर रडून आवरेना. खरं तर आमंत्रण नसतानाही आई वाढदिवसाला आली आणि तरी सर्व माणसांसमोर जावयाने असा अपमान केला. हे तिला सहन झाले नाही. तरीही शेवंताबाईंनी आपल्या लेकीला शांत राहण्यास सांगितले. एवढ्या खमक्या शेवंताबाई जावया पुढे मात्र गप्प बसल्या. सर्वांना आश्चर्य वाटले. कार्यक्रमात रंगाचा बेरंग नको, म्हणून छाया आईच्या आज्ञेवरून गप्प बसली. कार्यक्रमाला भरपूर माणसे आली होती.

कार्यक्रम धूमधडाक्यात साजरा झाला फक्त आईच्या अपमानाची सल मात्र छायाच्या मनात बोचत होती. भेटवस्तूंनी एक खोली भरली होती. स्वतः मुलांसाठी म्हणून छायाने हौसेने बऱ्याच वस्तू घेतल्या होत्या. मुलगा- मुलगी झाल्यापासून जावई बापूंच्या व्यापाराची भरभराट झाली होती. दोन दुकानांची, चार झाली होती. दारात दोन चारचाकी गाड्या होत्याच. जावाईबापुंना देवाने भरभरून दिले होते. छायाच्या रूपाने तर लक्ष्मी घरात नांदत होती; पण जावईबापूंचा डोळा सासरच्या बागायत शेतीवर होता. म्हणून तर काही ना काही कारण काढून ते पैसे मागत. वाढदिवसा दिवशी शेवंताबाईंचा अपमान केल्यावर, त्यांना मानसिक समाधान मिळाले. छायाला मात्र त्या दिवसापासून डोकं फिरल्यासारखं वाटू लागलं. तिने आजपर्यंत सहन केले; पण आता तिला सहन होईल असं वाटत नव्हतं. ती त्या दिवसापासून सारखी काहीतरी विचार करत होती. आईच्या अपमानामुळे तिला खूप वाईट वाटत होते. तिने काहीतरी ठाम निश्चय केला. आईला फोन लावला. तिच्याशी व्यवस्थित बोलून तिची खुशाली विचारली. सगळ्या बहिणींना फोन लावून बोलली. तिला आज साऱ्यांचीच खूप आठवण येत होती, असंही तिने सांगितले. त्या दिवशी रात्री जेवण झाल्यावर नवऱ्याशी बोलताना, तिची थोडी कुरबूर झाली. त्या रागात ती तशीच झोपली. सकाळी सगळे इकडे तिकडे आपापल्या कामात गुंतलेले असताना, ती दोन्ही बाळांना घेऊन शेजारांच्या शेतात गेली. अन् कुणाला काही कळायच्या आत तिने आपल्यासह तिघांच्या जीवनाचा विहिरीमध्ये उडी मारून अंत केला. थोड्या वेळाने घरामध्ये तिघंही नाही, हे लक्षात येताच शोधाशोध सुरू झाली. अन् शेजारच्या रामाला विहिरीकडे चपला दिसल्या.

त्या बघून तो घाबरून गावाकडे परतला. त्याने साऱ्यांना सांगितल्यावर विहिरीत शोधाशोध केली. तर काय ती माऊली आपल्या दोन बाळांना घेऊन देवाघरी गेली होती.

वाऱ्यासारखी ही बातमी पंचक्रोशीत पसरली. लाजणारी, अल्प बोलणारी छाया मनातल्या मनात कुढत राहिली. अन् शेवटी सर्व जगाला काही न सांगता, काही न बोलता सर्वांपासून दूर दूर निघून गेली. गावांमध्ये एकच गोंधळ सुरू झाला. वरकरणी छायाचा स्वभाव शांत होता. तरीही मनातली सल तिने अशी बाहेर काढली होती. नवऱ्याच्या वागण्याची जबरदस्त शिक्षा, तिने त्याला दिली होती. ज्या बाळांच्या जन्माचे सार्थक झाले असे त्याला वाटले. त्याच बाळांना घेऊन ती गुपचूप न सांगता गेली.

भांडण आरोप, प्रत्यारोप, पोलिस कम्प्लेंट सारं सारं झालं; पण गेलेला माणूस काही आला नाही. छायाने आपली खंत या रूपाने बाहेर काढली. छाया गेल्याने शेवंताबाई खचल्या, आजारी पडल्या. बहिणींनाही क्षणाक्षणाला ती आठवत होती. मुख्य म्हणजे छायाचा नवरा खूप शांत झाला. त्या दिवसापासून तर तो जास्त कोणाशी बोलत नसे. जणू जाता जाता छायाने त्याचा आनंद, बोलणं चोरून नेलं होतं. छायाने खरं तर खूपच टोकाची भूमिका घेतली होती. तिने नवऱ्यापासून फारकत घेऊन, आपला संसार पूर्ण करायचा होता; पण, पण हे काय. आपल्या बरोबर त्या निष्पाप जीवांच्या अंताला ती कारणीभूत ठरली. शेवटी संसार अर्ध्यावर सोडून गेल्यामुळे नवऱ्याच्या मनात एक सल टोचू लागली. आजपर्यंत

आपल्या असल्या वागण्याने आपण काय मिळवलं; पण मिळवण्यापेक्षा गमावल्याची यादी मोठी होती.

तो नजर लावून आकाशाकडे पाहात बसला होता. मोकळं, मोकळं आकाश. मन मात्र गच्चं भरलेलं साऱ्यांचच. आटोकाट प्रयत्नांनीही फुंकर न बसणार मन, काटोकाट भरलं होतं दुःखाने.

लेखिकेचा परिचय



नाव- सौ. आशा अरूण पाटील

शिक्षण - एम ए डी एड डी एस एम

छंद - लेखन, वाचन, कथाकथन, नाट्याभिनय

व्यवसाय- शिक्षिका

ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े प्रकाशित झालेला कथासंग्रह "एकटी" वाचण्यासाठी ही लिंक वापरा

- एकटी : कथासंग्रह: आशा पाटील
  - http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ekatee_asha_patil.pdf

इतर लेखन साहित्य - १. आठवणींचा पाऊस ( काव्यसंग्रह)

२. बिल्वदल ( काव्यसंग्रह)

३. शूरवीर ( बालकथासंग्रह)

४. बंटीची फजिती ( बालकथासंग्रह)

५. अमृतफळ ( बालकथासंग्रह)

६. आत्मनाद ( कथासंग्रह)

आगामी-- १. शेवंताबाई ( विनोदी कथासंग्रह)

२. स्वआरंभ ( बालकथासंग्रह)

३ .चमचमतारा ( बालगीत संग्रह) ४. आस परिवर्तनाची ( लेख संग्रह)

समावेश -१  राज्यशासनाच्या हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांकरिताच्या इयत्ता सातवी सुलभ भारती मध्ये समावेशित पाठ ' वाचनाचे वेड'

२ मालकीण कथा- सोलापूरी कथा( कथासंग्रह)  - संपादक- योगीराज वाघमारे, गवळी प्रकाशन , इस्लामपूर

३ जीवन - कविता, शब्दधन ( प्रातिनिधिक काव्यसंग्रह) - संपादक- दिगंबर शिंदे- यशोदीप पब्लिकेशन पुणे.

४ रितेपण- कविता- रत्नप्रिया प्रकाशन-

संपादक- आनंद घोडके- सोलापूर

५ शिवबा ( कविता) शिवकाव्याभिषेक ( प्रातिनिधिक काव्यसंग्रह) रत्नप्रिया प्रकाशन सोलापूर - संपादक- भाऊसाहेब कोळेकर६) आत्मनाद (कथासंग्रह)

पुरस्कार-

१) 'आठवणींचा पाऊस' काव्यसंग्रहास क्रांतीगुरू लहुजी साळवे राष्ट्रीय प्रतिष्ठान महाराष्ट्र यांचेतर्फे अण्णाभाऊ साठे उत्कृष्ट वाङ्:मय पुरस्कार

२)'बिल्वदल' कवितासंग्रहास अंकुर साहित्य संघ, अकोला यांचा बहिणाबाई चौधरी काव्य पुरस्कार

३) 'अमृतफळ' कथासंग्रहास -अंजनी साहित्य प्रतिष्ठानचा -बाबूराव वाघमोडे स्मृती कथा पुरस्कार

४) ‘ आत्मनाद' या कथासंग्रहास अक्षरज्योत पुरस्कार प्राप्त

५)पत्रलेखन पुरस्कार- सौ. शोभा माळवेपत्रलेखन पुरस्कार

६) विवेक कला व साहित्य मंडळ, उमरगा, उस्मानाबाद  कथालेखन स्पर्धा

७) सोलापूर जिल्हा वृत्तपत्रलेखक मंच पुरस्कार -वृत्तपत्रलेखनाकरिता

८) अक्षर ग्रंथ पुरस्कार- हिराबाई नेमचंद निंबर्गीकर ग्रंथालय, सोलापूर

९) शिवांजली साहित्य गौरव पुरस्कार- साहित्य लेखनाकरिता

१०) अ. भा. साने गुरूजी कथामाला उस्मानाबाद साहित्यसेवा पुरस्कार

११) सोलापूर महानगरपालिका विशेष   प्रमाणपत्र  साहित्यलेखनाकरिता

*शैक्षणिक लेखन*

१) जीवन शिक्षण या शैक्षणिक मासिकात 'आत्मविश्वासाचे बळ' लेख प्रकाशित

२)किशोर  या शैक्षणिक मासिकात 'रखमा' ही कथा प्रसिद्ध

* सहभाग*

१)किशोर मासिकाकडून आयोजित लेखन कार्यशाळेत सहभागी

२)जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था वेळापूर यांचेकडून विभागीय कार्यशाळेत मार्गदर्शक म्हणून निवड@@ शैक्षणिक- १)जनसेवा शिक्षक संघटनेतर्फे आदर्श शिक्षिका पुरस्कार

२)अखिल भारतीय साने गुरूजी कथामाला- निरंजनकुमार उमाठे आदर्श शिक्षिका पुरस्कार

३) सिध्दसंग प्रतिष्ठान सोलापूर - आदर्श शिक्षिका पुरस्कार

४)लोकशाहीर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे स्मृती राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार

५) लोकमत सखी गौरव पुरस्कार-शैक्षणिक

६)राज्यस्तरीय पंढरी गौरव आदर्श शिक्षिका पुरस्कार

७)सोलापूर जिल्हा  वृत्तपत्र लेखकमंच तर्फेआदर्श शिक्षिका पुरस्कार

८) मिडटाऊन लायन्स क्लब सोलापूर तर्फे आदर्श शिक्षिका पुरस्कार

९)जंगम समाज विकास संस्था बार्शी तर्फे आदर्श शिक्षिका पुरस्कार

१०)एल्गार सामाजिक साहित्य परिषद पिंपरी चिंचवड,पुणे तर्फे आदर्श शिक्षिका पुरस्कार

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.